

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

कटुसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक १०१ वा | बुधवार, दि. १८ नोव्हेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: – SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

जिल्हा बँकेची सत्ता भाजपच्या हाती; १० जागा बिनविरोध

उर्वरित नऊ जागांसाठी २६ नोव्हेंबरला मतदान

मोहिते-पाटलांची माघार; अध्यक्षपदाच्या समीकरणांकडे लक्ष!

सोलापूर (कटूसत्य वृत्त):– सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पार्श्वभूमीवर महत्वाची बातमी समोर आली आहे. सोलापूर जिल्हा बँकेवर भाजप पुरस्कृत सहकार विकास पॅनलची सत्ता निश्चित झाली आहे. संचालक मंडळाच्या 19 जगापैकी भाजप पुरस्कृत सहकार विकास पॅनलचे 10 उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. उर्वरित 9 जागावर भाजपच्या वतीने उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, विधान परिषद आमदार राजेंद्र राऊत, माजी आमदार राजन पाटील यांचे दोन्ही पुत्र विक्रांत आणि अजिंक्यराणा पाटील हे बिनविरोध निवडून आले आहेत.

19 पैकी 9 जागासाठी 26 नोव्हेंबर रोजी मतदान आणि 27 नोव्हेंबरला मतमोजणी होणार

दरम्यान, माजी आमदार प्रशांत परिचारक, शंभूराजे जगताप, यशवंत शिंदे, सिद्धेश्वर अवताडे, पृथ्वीराज माने, श्रीदीप हसापुरे यांची देखील बिनविरोध म्हणून निवड झाली आहे. दरम्यान सांगोला विधानसभा मतदारसंघाचे शेकापचे आमदार बाबासाहेब देशमुख हे सुद्धा भाजप पुरस्कृत पॅनलमध्ये सहभागी झाले आहेत. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या उर्वरित 19 पैकी 9 जागासाठी 26 नोव्हेंबर रोजी मतदान आणि 27 नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.



खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला

दरम्यान, उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची आजची शेवटची तारीख होती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी पणन आणि दुग्ध संस्था या दोन्ही मतदारसंघांतून आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. मोहिते-पाटील यांच्यासह 6 माजी संचालकांच्या अपात्रतेविरोधातील याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने 16 नोव्हेंबर 2026 रोजी फेटाळून लावली आहे.

भारतीय जनता पक्षाची एकहाती सत्ता येणार हे जवळपास निश्चित

दरम्यान, सोलापूर जिल्हा बँकेवर भारतीय जनता पक्षाची एकहाती सत्ता येणार हे जवळपास निश्चित झाले आहे. आत्तापर्यंत सोलापूर जिल्हा बँकेच्या 19 पैकी 10 जागेवर भाजपचे उमेदवार बिनविरोध निवडून आलेत. यामध्ये भाजप प्रणित आघाडीचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार राजेंद्र राऊत, यशवंत शिंदे, विक्रांत पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, श्रीदीप हसापुरे, पृथ्वीराज माने, अजिंक्यराणा पाटील, सिद्धेश्वर आवताडे, शंभूराजे जगताप यांचा समावेश आहे.या विजयी घौडदौडीबाबत भाजपचे माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जिल्हा बँक निवडणुकीत सक्षम उमेदवार देणे हा क्रायटेरिया लावला होता. ही निवडणूक लागायला नको होती मात्र ती लागली. मी आणि राजन पाटील यांनी बिनविरोध करण्यासाठी मोहिते पाटलांशी चर्चा केली होती मात्र दुर्दैवाने ते झालं नाही, मोहिते पाटलांनी अवास्तव जागा मागितल्या ज्यामुळे निवडणूक लागली, असं ते प्रशांत परिचारक म्हणाले. तसेच अध्यक्ष पदासाठी कोणतीही चर्चा नाही आमचा पक्ष ठरवेल तो अध्यक्ष असेल, असंही त्यांनी स्पष्ट केले.

आता अध्यक्षपदाच्या समीकरणांकडे लक्ष!

दहा जागांवरील बिनविरोध निवड, उर्वरित नऊ जागांसाठी होणारी निवडणूक, सहा माजी संचालकांची अपात्रता आणि मोहिते-पाटील गटाची माघार या सर्व घडामोडींमुळे जिल्हा बँकेच्या सत्तासमीकरणाला नवे वळण मिळाले आहे. भाजप पुरस्कृत सहकार विकास पॅनेलचे दहा उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने संचालक मंडळातील त्यांचे संख्याबळ स्पष्ट झाले आहे. मात्र, उर्वरित नऊ जागांवरील निकालानंतरच संपूर्ण संचालक मंडळाचे चित्र स्पष्ट होईल.

त्याचबरोबर बँकेचे आगामी अध्यक्षपद कोणाकडे जाणार, कोणत्या नेत्याला संधी मिळणार आणि जिल्ह्यातील सहकार क्षेत्रावर कोणाचे नेतृत्व राहणार, याबाबतही उत्सुकता निर्माण झाली आहे.

बिनविरोध निवड झालेल्या उमेदवारांमध्ये पुढील प्रमुख नावांचा समावेश आहे.

- सचिन कल्याणशेट्टी
- राजेंद्र राऊत
- प्रशांत परिचारक
- शंभूराजे जगताप
- यशवंत शिंदे
- सिद्धेश्वर आवताडे
- पृथ्वीराज माने
- श्रीदीप हसापुरे
- विक्रांत पाटील
- अजिंक्यराणा पाटील

विशेष म्हणजे सांगोल्याचे शेतकरी कामगार पक्षाचे आमदार बाबासाहेब देशमुख हेही भाजप पुरस्कृत पॅनेलमध्ये सहभागी झाल्याचे वृत्त आहे. त्यामुळे या निवडणुकीत पक्षीय सीमांपलीकडे सहकारातील स्थानिक राजकीय समीकरणेही महत्त्वाची ठरत आहेत.

शिक्षक भरतीच्या कथित घोटाळ्याचे राज्यव्यापी जाळे? एसआयटीच्या तपासावरच संशयाचे सावट!

पवित्र पोर्टलला बगल, वैयक्तिक मान्यता आणि अनुदान मंजुरीवर गंभीर प्रश्न

सोलापूर, पुणे, लातूर, धाराशिव, नाशिक, अमरावतीसह संपूर्ण राज्यातील नियुक्त्यांच्या चौकशीची मागणी



बार्शी (कटूसत्य वृत्त) : राज्यातील शिक्षक भरती प्रक्रियेतील कथित अनियमिततेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, पवित्र पोर्टलला बगल देऊन काही ठिकाणी नियमबाह्य नियुक्त्या झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. भरतीच्या जाहिराती, संस्थांचे ठराव, मुलाखत प्रक्रिया, आरक्षण रोस्टर, मंजूर पदे, वैयक्तिक मान्यता आणि अनुदान मंजुरी यांची सखोल चौकशी करण्याची मागणी समाज परिवर्तन महासंघाचे अध्यक्ष अजय दिगंबर पवार यांनी पुणे एसआयटीकडे केली आहे. विशेष म्हणजे, बाशीतील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व शाखांमधील भरती प्रक्रिया आणि पदाधिकाऱ्यांची भूमिका तपासण्याची मागणी करण्यात आल्याने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील अनेक शाळांसह धाराशिव, पुणे, लातूर, नाशिक आणि अमरावती जिल्ह्यांतील शैक्षणिक संस्थांची नावे तक्रारीत नमूद करण्यात आली आहेत. शिक्षकांबरोबरच शिपाई, लिपिक आणि प्रयोगशाळा सहाय्यकांच्या नियुक्त्यांचीही पडताळणी करावी, अशी मागणी आहे. तक्रारीत नमूद केलेली नावे ही चौकशीची मागणी म्हणून सादर करण्यात आली असून, त्यावरून संबंधित व्यक्ती दोषी ठरतात असे नाही.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, काही शिक्षकांनी दहा ते वीस वर्षे विनाअनुदानित तत्त्वावर सेवा केल्यानंतर त्यांना अनुदानित पदांवर संधी मिळाल्याची प्रकरणे आहेत. अशा नियुक्त्यांमध्ये सेवाज्येष्ठता, पात्रता, नियुक्तीची तारीख, मंजूर पदे आणि अनुदानित पदांची उपलब्धता तपासणे आवश्यक आहे. काही शिक्षकांचे वेतन रखडणे, थकीत वेतन आणि निवृत्तीनंतरच्या लाभांमध्ये अडथळे निर्माण होणे, असे मुद्देही तक्रारीत मांडण्यात आले आहेत.

पवित्र पोर्टलची प्रक्रिया पाळली का?

शिक्षक भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध झाली होती का? नियुक्त्या पवित्र पोर्टलच्या माध्यमातून झाल्या का? आरक्षण रोस्टरची अंमलबजावणी झाली का? संबंधित पदे शासनमान्य आणि रिक्त होती का? मुलाखतींची अधिकृत नोंद उपलब्ध आहे का? संस्थेच्या ठरावानुसारच नियुक्त्या झाल्या का? असे अनेक प्रश्न तक्रारीत उपस्थित करण्यात आले आहेत.

बार्शीतील महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील २० नियुक्त्यांची चौकशी

महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बार्शी येथील २० शिक्षकांच्या नियुक्त्या, वैयक्तिक मान्यता आणि भरती प्रक्रियेची मूळ कागदपत्रांच्या आधारे पडताळणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. त्या यादीत दहा शिक्षकांची नावे तक्रारीत नमूद आहेत. याशिवाय धाराशिव जिल्ह्यातील महाराष्ट्र संत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, तेर येथील सागर रामचंद्र डुरे आणि अक्षय अनिल डुरे यांच्या नियुक्त्यांची, तसेच बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेजमधील एका नियुक्तीची चौकशी करण्याची मागणी आहे.

सोलापूर जिल्ह्यातील शाळा चौकशीच्या रडारवर : सोलापूर जिल्ह्यातील पुढील शाळांमधील शिक्षक नियुक्त्यांची यादी तक्रारीसोबत जोडण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. संबंधित शाळांमधील जाहिराती, नियुक्ती आदेश, पवित्र पोर्टलवरील नोंदी, आरक्षण रोस्टर, मंजूर पदे आणि वैयक्तिक मान्यता आदेश तपासण्याची मागणी करण्यात आली आहे.

प्रमुख शाळांची नावे : 1. हरिभाई देवकरण प्रशाला, सोलापूर 2. सदाशिवराव माने विद्यालय, अक्कलकोट 3. महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला, यशवंतनगर 4. श्री मल्लिकार्जुन हायस्कूल, हत्तुरे नगर, सोलापूर 5. प्रतापसिंह मोहिते-पाटील विद्यालय, शिवपुरी 6. श्री विजयासिंह मोहिते-पाटील विद्यालय, विजोरी 7. जवाहरलाल नेहरू हायस्कूल, सिद्धेवाडी 8. श्री सावतमाळी विद्यालय, अकलूज-माळेवाडी 9. जिजामाता कन्या प्रशाला, अकलूज 10. श्री काळभैरवनाथ विद्यालय, गुरसाळे 11. श्री संत तुकाराम विद्यालय, बोंडले 12. द मॉडेल मल्टिपर्पज हायस्कूल, माळीनगर 13. हनुमान विद्यालय, शिंदेवाडी 14. एस.एम.टी. आर.एम.पी. कन्या प्रशाला, नातेपुते 15. कृष्णानंद विद्यामंदिर, पाटीलवस्ती 16. श्री बाणलिंग विद्यालय, फोंडशिरस 17. कवठेकर प्रशाला, पंढरपूर 18. मातोश्री रुक्मिणी गंगाराम होळकर विद्यालय, होळे 19. यशवंत विद्यालय, औराद 20. एस.व्ही.सी.एस. हायस्कूल, होटगी 21. एस.व्ही.सी.एस. हायस्कूल, बोरामणी 22. लोकसेवा विद्यामंदिर, मंद्रूप 23. विवेकानंद विकास प्रशाला, भंडारकवठे 24. जीवनज्योत प्रशाला, कंदलगाव 25. श्री पंचाक्षरी विद्यामंदिर, विंचूर 26. श्री भगवती गौरीमाता प्रशाला, धोतरी 27. गणेश रामचंद्र चितळे प्रशाला, बारूर 28. नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कूल, निलम नगर 29. एस.व्ही.सी.एस. हायस्कूल, एमआयडीसी, अक्कलकोट रोड 30. आपटे उपलप प्रशाला, पंढरपूर 31. जी.बी. घोडके विद्यालय, नांनज 32. साधना विद्यालय, तावशी 33. यशवंत विद्यालय, भोसे (खु.) 34. डी.एच. कवठेकर हायस्कूल, पंढरपूर 35. यशवंत विद्यालय, पंढरपूर 36. डॉ. भैय्यासाहेब वळसंगकर प्रशाला, तिंहे 37. सेंट जोसेफ हायस्कूल, सोलापूर 38. छत्रपती शिवाजी प्रशाला, सोलापूर 39. विवेक वर्धिनी विद्यालय, पंढरपूर 40. महात्मा फुले हायस्कूल, मर्डी या शाळांमधील शिक्षकांच्या नियुक्त्यांबरोबरच संबंधित संस्थांतील इतर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचीही चौकशी करावी, अशी मागणी आहे. तक्रारीत शाळांचे कोड, काही नियुक्त्यांच्या तारखा आणि शिक्षकांची नावेही दिल्याचे नमूद करण्यात आले आहे.

शिपाई, लिपिक आणि जात प्रमाणपत्रांचीही तपासणी करा!

चौकशी केवळ शिक्षक भरतीपुरती मर्यादित न ठेवता शिपाई आणि लिपिकांच्या नियुक्त्यांचीही तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. नियुक्ती जाहिराती, संस्थेचे ठराव, मंजूर पदे, आरक्षण रोस्टर, नियुक्ती आदेश आणि वैयक्तिक मान्यता तपासण्याची मागणी आहे. हरिभाई देवकरण प्रशालेतील शिपाई पंचकुला माणिकराव भोसले यांच्या नियुक्तीचीही पडताळणी करावी, असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. सर्व शिक्षक, शिपाई आणि लिपिक यांच्या जात प्रमाणपत्रांसह जात वैधता प्रमाणपत्रांची सक्षम प्राधिकरणामार्फत पडताळणी करावी. प्रमाणपत्रे कोणत्या प्राधिकरणाने आणि कोणत्या कागदपत्रांच्या आधारे दिली, याची तपासणी करावी. वेगवेगळ्या जिल्ह्यांतून प्रमाणपत्रे प्राप्त केली असल्यास त्यांचीही नियमानुसार पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

गणपत मोरे यांच्या कार्यकाळातील नियुक्त्यांची चौकशी करा!

तत्कालीन उपशिक्षण संचालक गणपत मोरे यांच्या पुणे आणि लातूर विभागातील कार्यकाळात झालेल्या शिक्षक भरती, नियुक्त्या आणि वैयक्तिक मान्यता प्रक्रियेची चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. त्यांचे पुत्र आदित्य गणपत मोरे आणि कन्या प्राजक्ता गणपत मोरे यांच्या नियुक्त्यांची स्वतंत्रपणे पडताळणी करण्याची मागणीही तक्रारीत आहे. या नियुक्त्यांमध्ये पवित्र पोर्टलचा वापर झाला होता का, जाहिरात प्रसिद्ध झाली होती का, आरक्षण रोस्टर आणि मंजूर पदांचे नियम पाळले होते का, वैयक्तिक मान्यता कोणत्या कागदपत्रांच्या आधारे देण्यात आली, याची तपासणी करावी, असे तक्रारदारांचे म्हणणे आहे. माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या कार्यकाळातील संबंधित नियुक्ती प्रस्ताव, मान्यता आदेश आणि अनुदान मंजुरीचीही पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

अक्कलकोटमधील संस्थेतील नियुक्त्यांवरही आक्षेप

श्रीमती धोंडूबाई शिक्षण प्रसारक मंडळ, चुंगी, कुरनूर, तालुका अक्कलकोट या संस्थेतील दोन नियुक्त्यांबाबत तक्रारीत आक्षेप नोंदवण्यात आला आहे. शिक्षक विक्रम देविदास बेडगे यांची कथितरीत्या बोगस कागदपत्रांच्या आधारे नियुक्ती झाल्याचा आरोप आहे. तसेच श्री. श्रीशिवशंकर स्वामी यांची अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती नियमबाह्य असल्याचा दावा करण्यात आला आहे. या दोन्ही प्रकरणांतील शैक्षणिक पात्रता, मूळ कागदपत्रे, संस्थेचे ठराव, अनुकंपा नियुक्तीचे निकष आणि वैयक्तिक मान्यता आदेशांची सखोल चौकशी करण्याची मागणी आहे.

नाशिक आणि अमरावतीतील नियुक्त्यांवरही तक्रार

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील कुकाणे येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय व महात्मा फुले ज्युनिअर कॉलेजमधील प्रयोगशाळा सहाय्यक शुभम भोजराज लोंढे आणि यश सुधीर मोरे यांच्या नियुक्त्यांबाबतही आक्षेप नोंदवण्यात आला आहे. पदांची मंजुरी, शैक्षणिक पात्रता, भरती जाहिरात, निवड प्रक्रिया, संस्थेचे ठराव आणि वैयक्तिक मान्यता आदेश तपासण्याची मागणी आहे. अमरावती जिल्ह्यातील मंगरूळपीर दस्तगीर येथील चंद्रभागाबाई वाकोडे विद्यालयातील सर्व शिक्षक नियुक्त्यांचीही चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. भरती जाहिराती, पवित्र पोर्टलवरील नोंदी, आरक्षण रोस्टर, मंजूर पदे आणि वैयक्तिक मान्यता आदेशांची पडताळणी करण्याची मागणी तक्रारीत आहे.

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व शाखा तपासा!

या तक्रारीतील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचालित सर्व शाळा, कनिष्ठ महाविद्यालये आणि इतर शैक्षणिक शाखांमधील भरती प्रक्रियेची सुरुवातीपासून चौकशी करण्याची मागणी. संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, विश्वस्त आणि इतर पदाधिकारी यांनी शिक्षक भरती, नियुक्ती प्रस्ताव, संस्थेचे ठराव, मंजूर पदे, वैयक्तिक मान्यता आणि अनुदान मंजुरी प्रक्रियेत कोणती भूमिका बजावली, याची तपासणी करावी, असे तक्रारदारांचे म्हणणे आहे. संस्थेच्या सर्व शाखांची अधिकृत यादी मागवून प्रत्येक शाळेतील शिक्षक, शिपाई आणि लिपिकांच्या नियुक्त्यांची कागदपत्रांसह पडताळणी करावी. केवळ काही निवडक नियुक्त्यांची चौकशी न करता संपूर्ण संस्थात्मक भरती प्रक्रियेचा तपास व्हावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

एसआयटीच्या तपासावरच प्रश्न; वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पुनर्तपासणीची मागणी

पूर्वी झालेल्या एसआयटी तपासाची व्याप्ती, निष्पक्षता आणि गती याबाबतही तक्रारदारांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. तपासावर राजकीय दबाव होता का, काही ठिकाणी आर्थिक हितसंबंध किंवा संस्थाचालक आणि अधिकाऱ्यांमध्ये संगनमत होते का, या शंशयांची स्वतंत्र पडताळणी वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. आता एसआयटीसमोर महत्त्वाचे प्रश्न आहेत : नियुक्त्या नेमक्या कोणत्या प्रक्रियेतून झाल्या? पवित्र पोर्टलची प्रक्रिया पाळण्यात आली का? जाहिराती, मुलाखती आणि संस्थेचे ठराव उपलब्ध आहेत का? संबंधित पदे शासनमान्य आणि रिक्त होती का? आरक्षण रोस्टरची अंमलबजावणी झाली का? वैयक्तिक मान्यता कोणत्या आधारावर देण्यात आली? अनुदान मंजुरीसाठी सादर केलेली कागदपत्रे नियमसंगत आहेत का? संस्थाचालक आणि संबंधित अधिकाऱ्यांची नेमकी भूमिका काय होती?

या सर्व प्रश्नांची उत्तरे मूळ कागदपत्रे, नियुक्ती आदेश आणि अधिकृत अभिलेखांच्या आधारे शोधावीत. दोष सिद्ध झाल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी; तर नियमाप्रमाणे नियुक्त झालेल्या शिक्षकांचे वेतन, निवृत्तीवेतन, वैद्यकीय विमा आणि इतर सेवा लाभ सुरक्षित ठेवावेत, अशी मागणी समाज परिवर्तन महासंघाचे अध्यक्ष अजय दिगंबर पवार यांनी पुणे एसआयटीकडे केली आहे.

तक्रारीत नमूद केलेल्या शिक्षकांची, कर्मचाऱ्यांची किंवा संस्थांची नावे ही चौकशीच्या मागणीचा भाग आहेत. कोणत्याही व्यक्तीविरुद्ध गैरव्यवहार सिद्ध झालेला असल्याचा निष्कर्ष या तक्रारीवरून काढता येत नाही. संबंधित संस्था आणि अधिकाऱ्यांचे म्हणणे तसेच एसआयटीची अधिकृत भूमिका समोर येणेही आवश्यक आहे. शिक्षक भरतीतील कथित अनियमितता खरी ठरल्यास हा केवळ काही नियुक्त्यांचा प्रश्न राहणार नाही, तर शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकता, गुणवत्तेवर आधारित भरती आणि पात्र उमेदवारांच्या हक्कांशी संबंधित गंभीर विषय ठरेल. त्यामुळे पुणे एसआयटी या तक्रारीची दखल घेऊन कितपत व्यापक चौकशी करते, याकडे आता शिक्षण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

याबाबत संबंधितांशी संपर्क साधून त्यांची बाजू समजून घेण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही तर काही जणांनी सांगितले की, माहिती घेऊन आमची बाजू देवू.

सीओपीडी दिनानिमित्त श्वास चेस्ट क्लिनिकमध्ये रविवारी मोफत तपासणी शिबिर

दमा तपासणी, स्पायरोमेट्री, पीएफटीसह तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला

धूम्रपानासह प्रदूषणामुळे सीओपीडीचा धोका

सोलापूर (कटूसत्य वृत्त):– श्वसनविकारांबाबत जनजागृती निर्माण करणे, फुफ्फुसांचे आरोग्य जपण्याचे महत्त्व पटवून देणे आणि श्वसनविकारांचे वेळेत निदान व्हावे, या उद्देशाने जागतिक सीओपीडी दिनानिमित्त रंगभवन परिसरातील श्वास चेस्ट क्लिनिकच्या वतीने रविवार, २२ नोव्हेंबर रोजी मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत होणाऱ्या या शिबिरात नागरिकांना मोफत दमा तपासणी, स्पायरोमेट्री, पीएफटी (फुफ्फुस कार्यक्षमता चाचणी) तसेच तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला उपलब्ध करून दिला जाणार असल्याची माहिती डॉ. सुयश पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या शिबिरामध्ये श्वसनाशी संबंधित विविध तक्रारींची तपासणी करून नागरिकांना आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन केले जाणार आहे. विशेषतः दीर्घकाळ खोकला, वारंवार धाप लागणे, श्वास घेताना घरघर होणे, छातीत घट्टपणा जाणवणे अशा तक्रारी असणाऱ्या नागरिकांसाठी हे शिबिर उपयुक्त ठरणार आहे.

याबाबत माहिती देताना श्वसनविकार तज्ज्ञ डॉ. सुयश पाटील यांनी सांगितले की, सीओपीडी हा फुफ्फुसांशी संबंधित दीर्घकालीन आजार असून, सुरुवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास तो गंभीर स्वरूप धारण करू शकतो. धूम्रपान, वाढते वायुप्रदूषण, धूळ, चुलीचा धूर आणि रासायनिक प्रदूषण यांसारख्या घटकांमुळे फुफ्फुसांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे श्वसनाचा त्रास जाणवणाऱ्या व्यक्तींनी वेळेत तपासणी करून घेणे आवश्यक आहे.



स्पायरोमेट्री आणि पीएफटी या तपासण्यांच्या माध्यमातून फुफ्फुसांची कार्यक्षमता तपासता येते. त्यामुळे श्वसनविकारांचे निदान आणि पुढील उपचारांची दिशा निश्चित करण्यास मदत होते. श्वास चेस्ट क्लिनिकमध्ये एफओटी (FOT) मशीनची सुविधाही उपलब्ध असून, श्वसनविकारांच्या तपासणीसाठी या आधुनिक सुविधेचा उपयोग केला जात असल्याची माहिती डॉ. पाटील यांनी दिली.

सीओपीडी आणि दम्यासारख्या श्वसनविकारांबाबत नागरिकांनी जागरूक राहावे, लक्षणे अंगावर न काढता वेळेत तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा आणि फुफ्फुसांच्या आरोग्याची काळजी घ्यावी, या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सोलापूर शहर व परिसरातील नागरिकांनी या मोफत तपासणी शिबिराचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. सुयश पाटील यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस तन्वीर कोटी उपस्थित होते.

शिबिराचे ठिकाण :
श्वास चेस्ट क्लिनिक, फर्स्ट चर्चसमोर, रंगभवन, सोलापूर.
दिनांक : रविवार, २२ नोव्हेंबर २०२६
वेळ : सकाळी १० ते दुपारी २
संपर्क :– 7588995591





संपादकीय

नेता देव नाही, जनतेचा सेवक आहे!

व्यक्तिपूजेच्या राजकारणात लोकशाहीचा गळा घोटला जातोय; प्रश्न विचारणारी जनता हाच लोकशाहीचा खरा आधार!

लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका, मतदान आणि सत्तांतर नव्हे. लोकशाही म्हणजे सत्तेला प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य, सत्ताधाऱ्यांना जाब विचारण्याचा अधिकार आणि जनतेच्या हितासाठी सत्तेवर अंकुश ठेवण्याची व्यवस्था! मात्र आजच्या राजकीय वातावरणात लोकशाहीच्या याच मूलभूत मूल्यांना व्यक्तिपूजेचे ग्रहण लागल्याचे चित्र दिसत आहे. नेता म्हणजे सर्वज्ञ, नेता म्हणजे सर्वश्रेष्ठ आणि नेत्याचा प्रत्येक निर्णय योग्यच, अशी मानसिकता जाणीवपूर्वक रुजवली जात आहे. ही प्रवृत्ती केवळ राजकीय संस्कृतीसाठी नव्हे, तर लोकशाहीच्या भवितव्यासाठीही धोक्याची घंटा आहे.

लोकशाहीत नेता हा जनतेचा सेवक असतो, मालक नाही. तो जनतेच्या मतांवर निवडून आलेला प्रतिनिधी असतो, देव नव्हे! जनतेने त्याच्यावर विश्वास टाकलेला असतो, अमर्याद अधिकार बहाल केलेले नसतात. त्यामुळे त्याने केलेल्या प्रत्येक कामाचा, घेतलेल्या प्रत्येक निर्णयाचा आणि खर्च केलेल्या सार्वजनिक पैशाचा हिशेब देणे अपरिहार्य आहे. लोकशाहीत सत्ता ही उपभोगाची वस्तू नसून जनतेने सोपवलेली जबाबदारी आहे. ही साधी गोष्ट विसरली जात असेल, तर लोकशाहीचा आत्माच हरवू लागला आहे, असे समजावे लागेल.

आज राजकारणात विचारांपेक्षा व्यक्ती मोठी करण्याची स्पर्धा सुरू आहे. नेत्यांच्या कायार्चे मूल्यमापन करण्याऐवजी त्यांच्या प्रतिमेची पूजा केली जात आहे. त्यांच्या प्रत्येक विधानाला अंतिम सत्य मानले जाते. त्यांच्यावर टीका करणाऱ्यांना शत्रू ठरवले जाते. प्रश्न विचारणाऱ्यांना विरोधक, देशद्रोही किंवा विकासविरोधी ठरवण्याची भाषा वापरली जाते. ही लोकशाहीची भाषा नाही; ही तर व्यक्तिकेंद्री सत्तेची मानसिकता आहे. ज्या व्यवस्थेत सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणे गुन्हा समजले जाते, त्या व्यवस्थेत सामान्य माणसाच्या अधिकारांचे संरक्षण कसे होणार?

नेता कितीही लोकप्रिय असला, त्याला कितीही मोठा जनाधार असला, तरी त्याच्या निर्णयांची चिकित्सा होणे आवश्यक आहे. लोकप्रियता म्हणजे निर्दोषत्व नव्हे. निवडणुकीतील विजय म्हणजे पुढील पाच वर्षासाठी जनतेच्या प्रश्नांपासून सुटका नव्हे. उलट मोठा जनादेश मिळालेल्या नेत्याची जबाबदारी अधिक मोठी असते. कारण जनतेने दिलेला कौल हा प्रश्न विचारण्याचा अधिकार काढून घेणारा परवाना नसतो.

नेत्यांचे समर्थक त्यांच्या चांगल्या कामांचे कौतुक करतात, हे स्वाभाविक आहे. गरिबांसाठी योजना राबवणारा, विकासकामे करणारा, संकटाच्या काळात जनतेच्या पाठीशी उभा राहणारा नेता निश्चितच कौतुकास पात्र असतो. मात्र कौतुक आणि अंधभक्ती यांमध्ये जमीन-अस्मानाचा फरक आहे. चांगले काम केले तर टाळ्या वाजवायच्या आणि चुकीचे काम केले तर गप्प बसायचे, ही भूमिका लोकशाहीला मारक आहे. नेत्याच्या चांगल्या कामाचे कौतुक करणारा नागरिकच त्याच्या चुकीच्या निर्णयावर प्रश्न विचारू शकतो, तेव्हाच खरी लोकशाही जिवंत राहते.

सत्ता, पैसा आणि स्वार्थ यांपासून राजकारण पूर्णपणे अलिप्त आहे, असे म्हणता येणार नाही. राजकीय नेतेही याच समाजातील सामान्य माणसे आहेत. त्यांच्याकडून चुका होऊ शकतात, निर्णय चुकू शकतात आणि सत्तेचा गैरवापरही होऊ शकतो. म्हणूनच लोकशाहीत संविधान, न्यायव्यवस्था, प्रसारमाध्यमे, विरोधी पक्ष आणि जागरूक नागरिक यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या सर्व संस्था आणि घटक सत्तेला प्रश्न विचारतात, नियंत्रण ठेवतात आणि जनतेच्या अधिकारांचे रक्षण करतात. त्यांना कमकुवत करण्याचा कोणताही प्रयत्न लोकशाहीच्या मुळावर घाव घालणारा आहे.

विशेषतः प्रसारमाध्यमांची जबाबदारी येथे अधिक महत्त्वाची ठरते. पत्रकारितेचे काम सत्ताधाऱ्यांच्या घोषणांचा जयजयकार करणे नाही, तर त्या घोषणांमागील वास्तव जनतेसमोर आणणे आहे. विकासाच्या दाव्यांमागील आकडेवारी तपासणे, सरकारी निर्णयांचे परिणाम मांडणे, भ्रष्टाचाराचे आरोप उघड करणे आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडणे हे पत्रकारितेचे कर्तव्य आहे. सत्तेला अस्वस्थ करणारा प्रश्न हाच अनेकदा जनतेच्या हिताचा प्रश्न असतो. त्यामुळे प्रश्न विचारणाऱ्या पत्रकारांना किंवा नागरिकांना विरोधक समजण्याची प्रवृत्ती थांबली पाहिजे.

आज जनतेनेही स्वतःला एक प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. आपण नेता निवडतो तो आपले प्रश्न सोडवण्यासाठी की त्याची पूजा करण्यासाठी? आपण मतदान करतो ते विकास, रोजगार, शिक्षण, आरोग्य, शेती आणि मूलभूत सुविधांसाठी की केवळ एखाद्या व्यक्तीच्या नावाच्या आकर्षणासाठी? आपल्या परिसरात पाणी नाही, रस्ते नाहीत, बेरोजगार तरुणांना काम नाही, शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही, सरकारी रुग्णालयात सुविधा नाहीत; अशा वेळी नेत्यांच्या प्रतिमांचे उदात्तीकरण करून सामान्य माणसाचे प्रश्न सुटणार आहेत का?

लोकशाहीत कोणतीही व्यक्ती अपरिहार्य नसते. व्यक्ती येतात आणि जातात; मात्र संविधान, संस्था आणि लोकशाही मूल्ये कायम राहिली पाहिजेत. नेत्यापेक्षा विचार मोठा, विचारांपेक्षा संविधानाचे मूल्य मोठे आणि या सर्वांपेक्षा जनहित सर्वोच्च असले पाहिजे. नेत्यांना देवत्व बहाल केल्याने त्यांची उंची वाढत नाही; उलट जनतेच्या प्रश्न विचारण्याच्या अधिकाराची उंची कमी होते.

शेवटी एकच सत्य अधोरेखित करावे लागेल, ते म्हणजे लोकशाहीला भक्तांची नाही, तर जागरूक नागरिकांची गरज आहे. नेत्याच्या जयजयकारापेक्षा त्याच्या कामाचा हिशेब मागणारा आवाज अधिक महत्त्वाचा आहे. कारण नेता चुकू शकतो, सत्ता निरंकुश होऊ शकते; पण प्रश्न विचारणारी जनता गप्प बसली, तर लोकशाही मात्र निश्चितच धोक्यात येते!

स्क्रीनवर गेम... वास्तवात क्राइम..!

अल्फा पिढीच्या बालमनात नेमकं चाललंय तरी काय?

हातात मोबाईल, डोक्यात सोशल मीडिया, डोळ्यांसमोर आभासी जग आणि मनात वाढता एकटेपणा... आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात घडणारी जेन झी पिढी नेमकी प्रगत होत आहे की मानसिकदृष्ट्या भरकटत आहे? आयुष्य कसे जगावे याबद्दल त्यांची मते स्पष्ट आहेत. या जेन झीच्या चार पावलं पुढं अल्फा पिढी दिसते. ज्या वयात हातात पाटी-पेन्सिल असावी, डोळ्यांत भविष्याची स्वप्ने असावीत आणि मनात प्रेम, माया, आपुलकीचे भाव असावेत, त्याच वयात काही मुलांच्या मनात हिंसा, द्वेष, सूड, विकृत विचार आणि गुन्हेगारी प्रवृत्ती निर्माण होत असतील, तर हा केवळ चिंतेचा विषय नाही, तर संपूर्ण समाजाला हादरवून सोडणारा प्रश्न आहे. कारण पंचकुलाच्या एका शाळेत तिसरीत शिकणाऱ्या अल्फा पिढीच्या मुलाने केजीमध्ये शिकणाऱ्या मुलीला अत्यंत निर्दयीपणे मारहाण केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला. मुलाच्या मारहाणीत मुलगी रक्तबंबाळ होऊन बेशुद्ध झाली, पण तरीही मुलगा तिला मारहाण करत होता. हा व्हिडिओ बघितल्यावर तिसरीच्या वर्गात शिकणाऱ्या आठ वर्षांच्या मुलांमध्ये एवढे क्रौर्य कुठून आले? का आले? या प्रश्नाने त्याच्या पालकांचीच नाही तर सरकारचीही झोप उडवली आहे. मुलाला पब्जी आणि तस्सम हिंसक व्हिडिओ गेम्स खेळण्याचे व्यसन जडल्याचे प्राथमिक माहितीत समोर आले आहे. त्याचेच हे साईड इफेक्ट्स असल्याचा त्याच्या कुटुंबाचा दावा आहे. अशा अनेक घटना घडत आहेत.

अल्फा पिढीकडून घडलेले गुन्हे जरी गंभीर असले तरी त्यांना शिक्षा होणे शक्य नाही. त्यामुळे समुपदेशन करून त्यांना सोडून देण्यात येऊ शकते, पण मुळात गुन्हेगारीच्या वाटेवर पाऊल टाकलेल्या या मुलांचे समुपदेशन करून त्याची मानसिकता बदलता येणार का? त्याच्यात तयार होत असलेल्या सैतानाला आवरता येणार का? हाच प्रश्न आहे. आपल्या देशात आजही अल्पवयीन गुन्हेगारांना कडक शिक्षा केली जात नाही. सुधारण्याची संधी दिली जाते. पण जेवढी मुलं पुढे जाऊन मोठे गुन्हे करतात, त्यांची पाळंमुळं लहानपणातच दडलेली असतात, असे मानसोपचारतज्ज्ञांनीही स्पष्ट केलेले आहे. आज शहरात व ग्रामीण भागात अल्पवयीन मुलांच्या हातून गंभीर गुन्हे घडतात. कुठे भरधाव गाडीखाली निष्पाप जीव तर कुठे मित्रच मित्राचा जीव घेतोय, तर कुठे किरकोळ वादातून हत्या केली जाते. कुठे टोळीयुद्धात अल्पवयीन मुलांचा वापर केला जातो. लहानपणी हिंसक असलेली मुलं पुढे जाऊन गुन्हेगार बनतात, हे अनेक घटनांमधून पुढे आले आहे. यामुळे आपण नक्की कोणता समाज घडवत आहोत. मुलांना फक्त झेन जी, अल्फा, बिटा नाव देऊन त्यांची स्टेट टॅग स्वीकारून आपण आपली जबाबदारी टाळू शकत नाही.

अनेक जेन झी व अल्फा पिढी पब्जी आणि इतर हिंसक व्हिडिओ खेळून मानवी संवेदना गमावून बसतात. रक्त येईपर्यंत कोणाला मारणं, त्याच्यासाठी सामान्य बाब झाली आहे. कारण ते रोज पब्जीमध्ये असेच खेळ खेळतात. त्यातूनच जीवघेणे हाल्ले होत आहेत. नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरोच्या (NCRB) २०२६ च्या ताज्या अहवालानुसार, भारतात अल्पवयीन मुलांनी केलेल्या गुन्ह्यांमध्ये म्हणजेच बालगुन्हेगारीमध्ये ११.२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. संपूर्ण देशाबद्दल बोलायचं झालं तर अल्पवयीन गुन्हेगारीशी संबंधित गुन्ह्यांचा आकडा गेल्या वर्षी ३९,३६४ होता तो आता वाढून ३४,८७८ वर पोहोचला आहे. म्हणजेच दर एक लाख लोकसंख्येमागे अल्पवयीन गुन्ह्याचे प्रमाण ७.९ वरून ८.९ पर्यंत वाढले आहे. मुख्य म्हणजे यातील अल्पवयीन मुलांमधील ७७.७ टक्के ते ८० टक्के मुलं ही १६ ते १८ वर्षे वयोगटातील आहेत. दरोडा, प्राणघातक हल्ला, विनयभंग, छेडछाड आणि लैंगिक अत्याचाराच्या गंभीर गुन्ह्यांत या मुलांचा आकडा वाढतोय.

हल्लीची मुलं सोशल मीडिया फ्रेंडली आहेत. त्यामुळे पैशाचे आमिष दाखवत अनेक भामटे या मुलांचा वापर सायबर गुन्ह्यांतही करत आहेत. काही ठिकाणी अमली पदार्थांच्या तस्करीबरोबरच शरीर विक्रीसाठीही या मुलांचा वापर केला जात आहे. दरम्यान, अल्पवयीनांकडून होणाऱ्या गुन्ह्यांत बिहार आणि महाराष्ट्र अव्वल आहेत. बिहारमध्ये १७७ टक्क्यांची वाढ झाली आहे तर दिल्लीत सर्वाधिक बालगुन्हे घडत आहेत. आतापर्यंत २,३०६ गुन्हे अल्पवयीन गुन्हेगारीचे आहेत. तर अल्पवयीन गुन्ह्यांत महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक आहे. देशातील एकूण बालगुन्हेगारीच्या १२ टक्के गुन्हे फक्त महाराष्ट्रात घडतात. ही धक्कादायक माहिती या अहवालातून समोर आली आहे. सर्वांत सुरक्षित राज्य असलेले महाराष्ट्र आज बिहारच्या बरोबरीने आहे. तज्ज्ञांच्या मते यामागे अनेक कारणे जरी असली तरी डिजिटलच्या या काळात मुलांवर सोशल मीडियाचा, आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचा सर्वाधिक प्रभाव आहे. इंटरनेट, ओटीटीवर सहज उपलब्ध होणाऱ्या हिंसक आणि अश्लील कंटेंटमुळे नकळत्या वयात उत्सुकतेपोटी काही मुलं गुन्हे करू लागली आहेत. आपण चुकीचे काही करतोय याची जाणीवदेखील त्यांना नसते. फक्त अनुभव, एक्साइटमेंटसाठीही काहीजण गुन्हे करत आहेत. तसेच शहरी भागात मुलं अमली पदार्थांच्या आहारी जाताना दिसतात. त्यातून पैशांसाठी चोरी, दरोडे घालणे असे गुन्हे त्यांच्याकडून घडू लागले आहेत. तर काही वेळा गुन्हेगारांच्या टोळ्या या मुलांचा वापर करत असल्याने मुलांना आपण गुन्हेगारीच्या विळख्यात कधी सापडलो ते देखील कळत नाही. ही आजची परिस्थिती आहे. साधारण 2010 नंतर जन्मलेली ही पिढी तंत्रज्ञानाच्या कुशीत वाढत आहे. मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया, ऑनलाइन गेमिंग आणि कृत्रिम बुद्धिमत्ता ही त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनली आहेत. जगभरातील माहिती त्यांच्या बोटांच्या टोकावर आहे; पण या माहितीचा योग्य वापर करण्याची समज त्यांच्या मनात विकसित होत आहे का? मुलांच्या हातात मोबाईल आहे, पण हात धरून चालवणारे पालक कुठे आहेत? इंटरनेटवर हजारो मित्र आहेत, पण मनातले दुःख ऐकणारा मित्र कुठे आहे? माहितीचा महासागर आहे, पण योग्य-अयोग्य ठरवण्याची विवेकबुद्धी कुठे आहे ? एक विचार करायला लावणारा प्रश्न आपण अल्फा पिढीला आधुनिक तंत्रज्ञान देत आहोत; पण त्याचबरोबर माणुसकी, संस्कार, संवेदना आणि विवेक देत आहोत का?

प्रा. काटकर
तात्यासाहेब शिवाजी
9226144836 अकलूज.
(महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक असून शैक्षणिक व सामाजिक विषयावर लेखन करतात)

'योग्य आहार - चवचवळ, महाराष्ट्र' अभियानांतर्गत सोलापूर जिल्ह्यात निबंध व पोस्टर स्पर्धा

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- अन्न व औषध प्रशासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'योग्य आहार - चवचवळ, महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यात योग्य आहार मेळावा, निबंध स्पर्धा आणि पोस्टर स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. या माध्यमातून विद्यार्थी, नागरिक, अन्न व्यावसायिक तसेच विविध शासकीय यंत्रणांचा सक्रिय सहभाग घेऊन अन्न सुरक्षा, सकस व संतुलित आहार आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

भारतीय अन्न सुरक्षा व मानक प्राधिकरण (FSSAI) आणि अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या Eat Right Meal उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांमध्ये या स्पर्धा घेतल्या जाणार आहेत.

निबंध स्पर्धा इयत्ता पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी दोन गटांत होणार आहे. पहिल्या गटात पाचवी ते आठवी आणि दुसऱ्या गटात नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांचा समावेश असेल. आरोग्यदायी जीवनशैली, निरोगी समाजाची निर्मिती, फळे आणि भाज्या खाण्याचे महत्त्व, निरोगी राहण्यासाठी योग्य आहार यांसारखे विषय स्पर्धेसाठी निश्चित करण्यात आले आहेत.

पोस्टर स्पर्धाही याच दोन गटांत आयोजित केली जाणार आहे. पोस्टरसाठी A3 आकाराचा ड्रॉइंग पेपर वापरणे आवश्यक असून, पोस्टरमध्ये सकस व संतुलित आहार, अन्न सुरक्षा, अन्न भेसळ प्रतिबंध, सुरक्षित अन्न हाताळणी, निरोगी जीवनशैली आणि आरोग्यविषयक संदेशांचा समावेश असावा. पोस्टर तयार करताना विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पनेतून व विचारांतून ते तयार करावे, अशी सूचना करण्यात आली आहे.

प्रत्येक शाळेने दोन्ही गटांमधून उत्कृष्ट तीन निबंध आणि उत्कृष्ट तीन पोस्टर निवडून शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावेत. जिल्हास्तरावर प्राप्त झालेल्या निबंध व पोस्टरमधून उत्कृष्ट कलाकृतींची निवड केली जाणार आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येणार आहे.

या अभियानांतर्गत जिल्ह्यात वॉकथॉन, सायकल रॅली, Eat Right Mela, माहितीपर स्टॉल्स, पथनाट्य, प्रात्यक्षिके आणि इतर नावीन्यपूर्ण उपक्रमही राबविण्यात येणार आहेत. मेळाव्यात अन्न सुरक्षा व आरोग्यविषयक जनजागृती प्रदर्शन, माहितीपर सत्रे आणि डॉक्टरांचे मार्गदर्शन आयोजित केले जाणार आहे.

शाळास्तरावरील स्पर्धा १ ते १५ डिसेंबर २०२६ या कालावधीत, जिल्हास्तरीय निवड प्रक्रिया १६ ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीत होणार आहे. वॉकथॉन व सायकल रॅली ११ जानेवारी २०२७ रोजी, तर Eat Right Mela १८ ते २४ जानेवारी २०२७ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे.

या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शासकीय व खासगी शाळा, महाविद्यालये, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका तसेच अन्य संबंधित संस्थांनी समन्वयाने सहभाग नोंदवावा, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त साहेबराव देसाई यांनी केले आहे.

अक्कलकोटमध्ये पेढा व मिठाई विक्रेत्यांवर अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने अन्न व औषध प्रशासनाच्या सोलापूर झोन-१ पथकाने पेढा उत्पादक आणि मिठाई विक्रेत्यांविरुद्ध धडक कारवाई केली. या कारवाईत एकूण ८५० किलो पेढा व मिठाईचा साठा जप्त करण्यात आला असून, त्याची किंमत २ लाख ५० हजार २० रुपये आहे. तसेच चार आस्थापनांना व्यवसाय बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले असून, मुख्य पुरवठादाराचा अन्न परवाना आणि अन्य एका आस्थापनेची नोंदणी निलंबित करण्यात आली आहे.

मुख्य मिठाई पुरवठादारावर कारवाई

अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने अक्कलकोट येथील मुख्य मिठाई पुरवठादार मे. रंगोली स्वीट मार्ट (गट नं. ६७४/१/बी/२, प्लॉट नं. ०५, पिरजादे प्लॉट, अक्कलकोट, जि. सोलापूर; मालक समीर बडेसाहब मकानदार) या आस्थापनेची तपासणी केली. यावेळी अस्वच्छ परिस्थितीत साठवणूक, लेबलविषयक नियमांचे उल्लंघन, अन्न सुरक्षा व मानके नियमांतील अनुसूची-४ मधील तरतुदींचे उल्लंघन तसेच मिठाईचा दर्जा निकषांनुसार नसल्याचा संशय आढळून आला.

या ठिकाणाहून ३९८ किलो कंदी पेढा आणि ४३१ किलो स्वीट हलवा असा एकूण ८२९ किलो साठा जप्त करण्यात आला. या साठ्याची किंमत २ लाख ५० हजार २० रुपये आहे. कंदी पेढा व स्वीट हलव्याचे नमुने प्रयोगशाळेतील विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत. तसेच या आस्थापनेचा अन्न व्यवसाय परवाना निलंबित करण्यात आला आहे.

मंदिर परिसरातील १२ दुकानांची तपासणी

दि. १३ नोव्हेंबर २०२६ रोजी श्री स्वामी समर्थ मंदिर परिसरातील पेढा व प्रसाद विक्री करणाऱ्या १२ दुकानांची तपासणी करण्यात आली. या तपासणीदरम्यान चार अनौपचारिक नमुने घेण्यात आले. तसेच २१ किलो स्वीट हलवा, अंदाजे ७ हजार ३५० रुपये किमतीचा साठा जप्त करून नष्ट करण्यात आला.

यामध्ये मे. सलीम मकानदार पेढा स्टॉल येथून ३ किलो स्वीट हलवा (किंमत १ हजार ५० रुपये) जप्त करण्यात आला. या ठिकाणाहून स्वीट हलवा व लेमन पेढ्याचे दोन नमुने घेण्यात आले. मे. रंगोली स्वीट मार्ट येथून १८ किलो स्वीट हलवा (किंमत ६ हजार ३०० रुपये) जप्त करण्यात आला असून, स्वीट हलव्याचा एक नमुना घेण्यात आला. मे. वटवृक्ष स्वामी कृपा स्टोअर्स येथून लेमन पेढ्याचा एक नमुना घेण्यात आला.

याशिवाय मे. गुरुकृपा पूजा भंडार, मे. समर्थ कृपा साहित्य भंडार, मे. साई समर्थ बुक स्टॉल अँड प्रसाद भंडार, मे. पाटील स्वीट शॉप, मे. गुरुदत्त धार्मिक ग्रंथ भंडार, मे. सद्गुरू स्वामी समर्थ धार्मिक भांडार, मे. गुरुलीला पूजा भंडार (बेडर गल्ली), मे. श्री गणेश कॅसेट हाऊस अँड स्वीट मार्ट आणि मे. समर्थ स्वीट स्टॉल या आस्थापनांचीही तपासणी करण्यात आली.

चार आस्थापनांना व्यवसाय बंदचे आदेश

तपासणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने प्रशासनाने पुढील चार आस्थापनांना व्यवसाय बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

१. मे. समर्थ स्वीट स्टॉल, स्वामी समर्थ मंदिरासमोर, अक्कलकोट. २. मे. पाटील स्वीट शॉप, स्वामी समर्थ मंदिरासमोर, अक्कलकोट. ३. मे. रंगोली स्वीट मार्ट, स्वामी समर्थ मंदिरासमोर, अक्कलकोट. ४. मे. सलीम मकानदार पेढा स्टॉल, स्वामी समर्थ मंदिरासमोर, अक्कलकोट.

याशिवाय मे. रंगोली स्वीट मार्ट, पिरजादे प्लॉट, अक्कलकोट या मुख्य पुरवठादाराचा अन्न व्यवसाय परवाना निलंबित करण्यात आला आहे. तसेच मे. गुरुकृपा पूजा भंडार, स्वामी समर्थ मंदिरासमोर, अक्कलकोट या आस्थापनेची नोंदणी निलंबित करण्यात आली आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

ही कारवाई सहआयुक्त (अन्न) श्रीकांत आर. करकळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त (अन्न) एस. ई. देसाई, अन्न सुरक्षा अधिकारी एखंडे आणि हिरेमठ यांच्या पथकाने केली.

अक्कलकोट येथे येणाऱ्या भाविकांना सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून तपासणी व कारवाई करण्यात येत असून, अन्नपदार्थांची खरेदी करताना नागरिकांनीही दक्षता घ्यावी, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

टेंभुर्णीला स्वतंत्र अग्निशमन गाडी मिळणार?

ग्रामपंचायत सदस्यांचे पालकमंत्र्यांना साकडे

टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):- टेंभुर्णी शहरासह परिसरात गेल्या सहा महिन्यांत आगीच्या चार मोठ्या दुर्घटना घडून कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. वारंवार घडणाऱ्या या घटनांच्या पार्श्वभूमीवर शहराच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, टेंभुर्णी शहरासाठी स्वतंत्र अग्निशमन केंद्र आणि सुसज्ज अग्निशमन गाडी उपलब्ध करून देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. या गंभीर प्रश्नाकडे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे लक्ष वेधत टेंभुर्णीतील ग्रामपंचायत सदस्यांनी त्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. या मागणीला पालकमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने बैठक आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत.



टेंभुर्णी हे शहर दिवसेंदिवस विस्तारत असून, येथे औद्योगिक वसाहत (एमआयडीसी), मोठी व्यापारी बाजारपेठ, असंख्य दुकाने आणि पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग असल्याने अग्निसुरक्षेच्या दृष्टीने स्वतंत्र अग्निशमन यंत्रणा असणे अत्यावश्यक बनले आहे. मात्र, शहरात सध्या स्वतःची अग्निशमन गाडी उपलब्ध नसल्याने आगीची घटना घडल्यास कुडुर्वाडी, इंदापूर किंवा माळीनगर येथून अग्निशमन गाडी मागवावी लागते.

परिसरातील अंतर आणि घटनास्थळापर्यंत पोहोचण्यासाठी लागणारा वेळ लक्षात घेता अग्निशमन गाडीला तब्बल ४५ मिनिटे ते एक तास लागतो. तोपर्यंत आगीने रौद्ररूप धारण केलेले असते. त्यामुळे मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याबरोबरच नागरिकांच्या जीवितालाही धोका निर्माण होतो. आगीच्या दुर्घटनेत सुरुवातीची काही मिनिटे निर्णायक ठरतात. अशा परिस्थितीत वेळेवर अग्निशमन यंत्रणा उपलब्ध न झाल्यास नुकसान टाळणे कठीण होते.ही बाब लक्षात घेऊन ग्रामपंचायत सदस्य मुक्ताबाई गुरुलिंग पाटील, आरती लखन पवार, नागनाथ वाघे, बाळासाहेब ढगे, कैलास सातपुते आणि ऋषिकेश बोबडे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेतली. टेंभुर्णी शहराची वाढती लोकसंख्या, औद्योगिक क्षेत्राचा विस्तार, व्यापारी उलाढाल आणि महामार्गावरील अपघातांची शक्यता याबाबत त्यांनी सविस्तर माहिती देत स्वतंत्र अग्निशमन केंद्र व अग्निशमन गाडीची आवश्यकता अधोरेखित केली.

या मागणीचे गांभीर्य ओळखून पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना तातडीने बैठक आयोजित करून या प्रश्नावर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. त्यामुळे टेंभुर्णीकरांच्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या अग्निशमन केंद्राच्या मागणीला आता चालना मिळण्याची चिन्हे दिसत आहेत.

टेंभुर्णी शहराचा झपाट्याने वाढणारा विस्तार आणि औद्योगिक व व्यापारी क्षेत्राचे महत्त्व पाहता अग्निशमन केंद्र ही केवळ सुविधेची मागणी नसून नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या संरक्षणासाठी आवश्यक बाब आहे. त्यामुळे शासनाने या मागणीचा गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर स्वतंत्र अग्निशमन केंद्र आणि सुसज्ज अग्निशमन गाडी उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा ग्रामपंचायत सदस्यांनी व्यक्त केली आहे.या निवेदनावर ग्रामपंचायत सदस्य मुक्ताबाई गुरुलिंग पाटील, आरती लखन पवार, नागनाथ वाघे, बाळासाहेब ढगे, कैलास सातपुते आणि ऋषिकेश बोबडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

वात्रटिका

घात अपघात

विषय एकच आणि
पुन्हा कोल्हेकुई आहे...
फोटो दाखवून कोणाकडे
त्यांची संशयाची सुई आहे...
फटकारले आणि सगळ्यांनी
लगेच सारे झिडकारले...
तत्परतेने सेवा देणारे असतात
त्यांनी समोरच्याला गप्प केले...

हणमंत पडवळ
धाराशिव
8698067566

एएनएम-जीएनएम प्रवेशासाठी कॅप फेरी-२ चे वेळापत्रक जाहीर

मुंबई, (कटूसत्य वृत्त):- एएनएम व जीएनएम अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) दुसऱ्या फेरीचे सुधारित वेळापत्रक महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने जाहीर केले आहे. उमेदवारांना १८ व १९ नोव्हेंबर रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाइन पसंतीक्रम नोंदविता येणार असून, एएनएमसाठी ही सुविधा केवळ महिला उमेदवारांना उपलब्ध आहे.

कॅप फेरी-२ ची निवड यादी २० नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध होईल. निवड झालेल्या उमेदवारांनी २१ ते २४ नोव्हेंबरदरम्यान आवश्यक कागदपत्रे व शुल्कासह संबंधित महाविद्यालयात उपस्थित राहून प्रवेश निश्चित करावा.

त्यानंतर २५ ते २६ नोव्हेंबरदरम्यान संस्थास्तरीय प्रवेश फेरीसाठी ऑनलाइन नोंदणी व कागदपत्रे अपलोड करण्याची प्रक्रिया राबविण्यात येईल. पात्र उमेदवारांना २७ व २८ नोव्हेंबर रोजी संबंधित महाविद्यालयात अर्ज सादर करता येतील. पहिली निवड यादी २८ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानुसार २९ व ३० नोव्हेंबर रोजी प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली जाईल.

एएनएम व जीएनएम अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर २०२६ निश्चित करण्यात आली आहे. उमेदवारांनी प्रवेश प्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक, पात्रता व आवश्यक सूचनांसाठी www.mahacet.org या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळाने केले आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादक: श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालय: एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादक: पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादक: सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागार: ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

वारकरी, भाविकांसाठी पश्चिमद्वार ते चौफळा एकेरी मार्ग

जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन यांनी जारी केला आदेश

पंढरपूर (कटूसत्य वृत्त):- कार्तिक यात्रा सोहळा शनिवार, दि. 21 नोव्हेंबर 2026 रोजी संपन्न होत असून, यात्रा सोहळा कालावधीत दि. 10 ते 24 नोव्हेंबर 2026 असा आहे. या सोहळ्यासाठी सुमारे 08 ते 10 लाख भाविक शहरात येतात. विठ्ठल रूक्मिणी मंदिराकडे येणारा व जाणारा मार्ग एकच असलेने भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात असते. अशावेळी चेंगराचेंगरी होवून जीवित हानी होण्याची दाट शक्यता असलेने दि. 20 नोव्हेंबर रोजी सकाळी 06.00 ते दि.21 नोव्हेंबर 2026 रोजीचे रात्रीचे 11.59 वाजेपर्यंत पश्चिमद्वार ते चौफाळा हा मार्ग वारकरी, भाविक यांच्याकरीता बाहेर पडण्यासाठी एकेरी रहदारीस खुला ठेवणेबाबत आदेश जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन यांनी जारी केले आहेत.

कार्तिक यात्रा सोहळ्याकरीता लाखो भाविक पंढरपूर शहर व परीसरात येतात व एकादशी सोहळ्यादिवशी चंद्रभागा स्नान करून भाविक श्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतात. तेव्हा महाद्वार घाट व आजूबाजूच्या रस्त्यामध्ये लाखो भाविकांची गर्दी असते. सदरची गर्दी नियंत्रणात आणणेसाठी पोलीस प्रशासनाला मानवी साखळीचा व रस्सीचा वापर करावा लागतो. दिवसेंदिवस भाविकांची संख्या वाढत असून भाविकांना पुरविण्यात येणा-या सोईसुविधा कमी पडू नये यासाठी प्रशासन कार्यरत आहे. तथापि पंढरपूर शहरातील भाविकांची संख्या व सुरक्षितता लक्षात घेता यात्रा सोहळ्यात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासनाकडून गर्दी व्यवस्थापनाचे नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे. पश्चिमद्वार ते चौफाळा हा एकेरी मार्ग झाल्यास स्टेशन रोडकडून येणारे वारकरी, भाविक हे श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक भादुले चौक ते नाथ चौक तांबडा मारूती चौक-महाद्वार चौकमार्गे नामदेव पायरी येथे दर्शनासाठी जावू शकतात. तसेच प्रदक्षिणामार्गे येणारे भाविक हे उत्पात गल्ली येथील रस्त्याने नामदेव पायरी येथे दर्शनासाठी जावू शकतात.

प्रशासनाकडून दर्शनरांग व्यवस्थापन करून गर्दी आटोक्यात आणण्याची कार्यवाही केली जाते. श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिराकडे जाणारे रस्ते अरूंद असून त्याठिकाणी येणारे व जाणारा मार्ग एकच असलेने भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात असते. अशावेळी चेंगराचेंगरी होवून जीवितहानी होण्याची दाट शक्यता आहे. पश्चिमद्वार ते चौफाळा हा मार्ग वारकरी, भाविकांना बाहेर पडण्याचा एकेरी रहदारी मार्ग केल्यास गर्दीवर नियंत्रण करणे सुरक्षित होईल. त्यामुळे पश्चिमद्वार ते चौफाळा हा मार्ग वारकरी भाविकांसाठी बाहेर पडण्याचा एकेरी रहदारीसाठी होणे सुरक्षिततेच्यादृष्टीने महत्वाचे आहे.

या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अध्यक्ष एस कार्तिकेयन यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 34 (क) अन्वये, सदर आदेश पारीत केला आहे.या आदेशाचे उल्लंघन झाल्यास उल्लंघन करणाऱ्या विरूद्ध आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 नुसार तसेच भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 223 नुसार कारवाईस पात्र राहील. असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

समाज माध्यमांवर प्रसारीत झालेल्या बातमीची गंभीर दखल घेऊन प्रादेशिक परिवहन विभागाची कारवाई

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- दिनांक 16 नोव्हेंबर 2026 रोजी सायंकाळी 05.30 वाजेच्या सुमारास होटगी रोडवरील होंडा शोरूमसमोर MH13BV1171 या क्रमांकाच्या ऑटोरिक्षाच्या चालकाने मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवून अपघात घडविल्याची बातमी समाज माध्यमांवर आली होती. या घटनेची त्वरित दखल घेऊन प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या आदेशानुसार वायूवेग पथकाने 'नई जिंदगी' येथे जाऊन संबंधित रिक्षावर कायदेशीर कारवाई केली आहे; मात्र या कारवाईदरम्यान चालक फरार झाला आहे. सदर रिक्षावर मोटार वाहन कायद्याच्या तरतुदींन्वये कारवाई करण्यात आली असून, 10 हजार रुपये इतकी दंड आकारण्यात आला आहे.

तसेच, यापुढे अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी होटगी रोड व शहरातील इतर मुख्य मार्गावर मद्यपान करून व बेदरकारपणे रिक्षा किंवा इतर वाहने चालविणाऱ्या चालकांविरुद्ध प्रादेशिक परिवहन कार्यालयमार्फत विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. नागरिकांच्या सुरक्षेसाठी ही मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असून दोषींवर कठोर दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जाईल, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

अशी माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांनी दिली आहे.

जिल्हास्तरीय युवा महोत्सवात युवक-युवतींनी सहभागी व्हावे

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- युवकांच्या सर्वांगीण विकासासोबतच संस्कृती व परंपरेचे जतन, युवकांच्या अंगभूत कलागुणांना वाव देणे आणि राष्ट्रीय एकात्मतेला चालना देण्याच्या उद्देशाने जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन बुधवार, दि. 18 नोव्हेंबर 2026 रोजी करण्यात आले आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्या वतीने निर्मलकुमार फडकुले सभागृह, सिद्धेश्वर मंदिराजवळ, सोलापूर येथे सकाळी 9 वाजता हा महोत्सव होणार आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दरवर्षी या महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यामध्ये जिल्ह्यातील 15 ते 29 वयोगटातील युवक-युवतींना सहभागी होता येणार आहे. यासाठी स्पर्धकांची जन्मतारीख 18 ऑगस्ट 1997 ते 17 ऑगस्ट 2011 या कालावधीतील असणे आवश्यक आहे. सहायक कर्मचाऱ्यांचे वय 18 ते 40 वर्षे असावे.

विविध कलाप्रकारांत स्पर्धांचे आयोजन

युवा महोत्सवात लोकनृत्य, लोकगीत, पथनाट्य, काव्यलेखन आणि चित्रकला या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. लोकनृत्य स्पर्धेसाठी 7 मुख्य सदस्य व 3 सहायक सदस्य, तर लोकगीतासाठीही 7 मुख्य सदस्य व 3 सहायक सदस्य असतील. या दोन्ही स्पर्धांसाठी सादरीकरणाचा कालावधी 5 ते 8 मिनिटे असेल. पथनाट्य स्पर्धेसाठी 10 सदस्य असून सादरीकरणाचा कालावधी 1 ते 7 मिनिटे असेल. काव्यलेखनासाठी एका स्पर्धकाला 1.5 तास, तर चित्रकलेसाठी दोन स्पर्धकांना 6 तासांचा कालावधी देण्यात येणार आहे.

विजेत्यांना रोख पारितोषिके

स्पर्धांमधील विजेत्यांना पुढीलप्रमाणे रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत.

लोकनृत्य : प्रथम 7 हजार रुपये, द्वितीय 5 हजार रुपये, तृतीय 3 हजार रुपये.

लोकगीत : प्रथम 5 हजार रुपये, द्वितीय 3 हजार रुपये, तृतीय 2 हजार 500 रुपये.

पथनाट्य : प्रथम 5 हजार रुपये, द्वितीय 3 हजार रुपये, तृतीय 2 हजार 500 रुपये.

काव्यलेखन : प्रथम 3 हजार रुपये, द्वितीय 2 हजार रुपये, तृतीय 1 हजार 500 रुपये.

चित्रकला : प्रथम 3 हजार रुपये, द्वितीय 2 हजार रुपये, तृतीय 1 हजार 500 रुपये.

'विकसित भारतासाठी नशामुक्त युवा' हा स्पर्धांचा विषय

सर्व सांस्कृतिक स्पर्धांसाठी 'विकसित भारतासाठी नशामुक्त युवा' हा विषय निश्चित करण्यात आला आहे. स्पर्धकाचे वय 17 नोव्हेंबर 2026 रोजी 15 ते 29 वर्षांदरम्यान असणे आवश्यक आहे. स्पर्धकांनी दहावीचे बोर्ड प्रमाणपत्र आणि आधार कार्डची छायांकित प्रत सादर करणे बंधनकारक आहे. तसेच माय भारत पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक असून त्यासाठी https://mybharat.gov.in/yuva_register या संकेतस्थळाचा वापर करावा.

एका युवकाला केवळ एका स्पर्धा प्रकारात सहभागी होता येईल. सादरीकरणामध्ये आक्षेपार्ह भाषा किंवा धार्मिक भावना दुखावणारा आशय नसावा. चित्रकला व काव्यलेखनातील साहित्य मौलिक असणे आवश्यक असून वाङ्मयचौर्य अथवा प्रताधिकार भंग असता कामा नये. सांस्कृतिक सादरीकरणासाठी वेशभूषा पारंपरिक, सुसंस्कृत व सादरीकरणास अनुरूप असावी.

17 नोव्हेंबरपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विहित नमुन्यातील प्रवेश अर्ज शाळा, महाविद्यालय किंवा संस्थाप्रमुखांच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह दि. 17 नोव्हेंबर 2026 रोजी दुपारी 2 वाजेपर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सोलापूर येथे जमा करावेत. तसेच प्रवेश अर्ज jilhayuwamahotsav@gmail.com या ई-मेलवरही पाठविता येतील. मात्र, मूळ अर्ज स्पर्धेच्या वेळी सादर करणे बंधनकारक आहे.

सहभागी स्पर्धकांना नियमानुसार प्रवास भत्ता व भोजनाची व्यवस्था करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी मुख्य क्रीडा अधिकारी दत्तात्रय वरकड यांच्याशी ७२१९१५५२५२, ९५०३५२०२५८ किंवा ८०१०३५०४२४ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

जिल्ह्यातील सर्व उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालये, राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस), राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) विभाग तसेच युवक मंडळांनी आपल्या परिसरातील जास्तीत जास्त कलावंत व गुणवंत युवक-युवतींना या महोत्सवात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहारे यांनी

वृक्ष संवर्धन समिती बार्शीने तयार केले पक्षांसाठी पाणवटे

बार्शी (कटूसत्य वृत्त):- सध्या दुष्काळ ग्रस्त परिस्थिती असल्यामुळे सगळीकडे चिंतेचे वातावरण आहे. येणाऱ्या दिवसात पाण्याचे नियोजन कसे करायचे. शेतीचे सोडा पण पिण्याला देखील पाणी मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागणार आहे. अशा परिस्थितीत वृक्ष संवर्धन समिती बार्शीने पक्षांची काळजी घेत कृत्रिम पानवटे तयार करण्यास सुरुवात केली आहे. माणूस आपल्या अन्नपाण्याची व्यवस्था कशी ही करेल पण या पर्यावरणाचे मुख्य घटक असलेले पक्षी कीटक आणि मधमाशा यांच्या देखील जीवन मरणाचा प्रश्न सध्या आहे. याचेच भान ठेवून वृक्ष संवर्धन समितीमार्फत शासकीय आयटीआय परिसरात दोन सिमेंटचे बशी सारखे सुंदर पाणवटे तयार करण्यात आले आहेत. गेल्या दोन वर्षापूर्वी या परिसरात वृक्ष संवर्धन समिती मार्फत दुर्मिळ वृक्ष उद्यान तयार करून तेथे अनेक देशी आणि दुर्मिळ पर्यावरणाला उपयोगी पक्षांच्या आवडीची झाडे त्या ठिकाणी लावलेली आहेत. त्यामुळे त्या परिसरात पक्षांचा वावर वाढला आहे. सकाळच्या रामप्रहरी पक्षांची किलबिलाट त्या ठिकाणी असते. यामध्ये सुगरण, चिमणी, काळी चिमणी, कोतवाल, सूर्यपक्षी, भारद्वाज, कावळे, चित्तर, वेडा राघू, पांगळी/पाकोळी,



मुनिया, टिवटीवी, साळुंकी, शिंपी, पारवा, व्हला येडा राघू, पोपट,कावळे अशा प्रकारच्या स्थानिक पक्षांचा समावेश आहे. भविष्यात हा परिसर पक्ष्यांनी गजबजलेला असेल आणि अशाच प्रकारचे पाणवटे शहरातील विविध भागात करण्याचा माणस आहे असे वृक्ष संवर्धन समितीत बार्शीचे अध्यक्ष उमेश काळे यांनी सांगितले.

गेल्या आठ वर्षापासून बार्शी शहर आणि परिसरात वृक्ष संवर्धन समिती मार्फत अनेक झाडे लावून ती संवर्धित केली आहेत. झाडांबरोबरच पर्यावरणातील उपयुक्त अशी जैवविविधता टिकवण्यासाठी वृक्ष संवर्धन समिती बार्शी ने उचललेले हे मोठे पाऊल आहे.

या उपक्रमासाठी शासकीय आयटीआय चे प्रिन्सिपल प्रदीप हरिदास यांचे देखील सहकार्य लाभले आहे हे पाणवटे तयार करण्यासाठी वृक्ष संवर्धन समितीचे सदस्य संतोष कुमार गायकवाड, प्रा आनंद धुमाळ, राहुल तावरे, मोहम्मद शेख, अक्षय घोडके, उमेश नलवडे, राणा देशमुख, सायरा मुल्ला, सुधीर वाघमारे, डॉ. प्रवीण मिरगणे, डॉ. श्रीराम देशमुख, सचिन थोरबोले, डॉ वासुदेव सावंत, दयानंद रेवडकर यांनी परिश्रम घेतले.

कार्तिकी वारीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथे प्रादेशिक परिवहन विभागाकडुन, विशेष रिक्षा तपासणी मोहीम

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- कार्तिकी वारीच्या अनुषंगाने पंढरपूर येथे येणाऱ्या वारकरी व भाविकांचा प्रवास सुरक्षित, सुकर आणि विनाअडथळा व्हावा, तसेच शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी, या उद्देशाने प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर यांच्या वतीने दिनांक 13 ते 15 नोव्हेंबर 2026 या कालावधीत पंढरपूर शहरात विशेष रिक्षा तपासणी मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या दोन वायुवेग पथकांमार्फत शहरातील एकूण 61 ऑटोरिक्षांची तपासणी करण्यात आली. तपासणीअंती वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या 20 ऑटोरिक्षांविरुद्ध मोटार वाहन अधिनियमातील तरतुदींनुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली.

सदर मोहिमेदरम्यान रिक्षाचालकांना प्रवाशांकडून नियमानुसारच भाडे आकारण्याबाबत, गर्दीच्या ठिकाणी वाहन चालविताना विशेष खबरदारी घेण्याबाबत तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या. विशेषतः चौपाळा ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या मार्गावर वारीच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात वारकरी व भाविकांची वर्दळ असते. त्यामुळे सदर मार्गावर रिक्षा चालवू नयेत अथवा रिक्षा उभ्या करू नयेत, अशा स्पष्ट सूचना रिक्षाचालकांना देण्यात आल्या आहेत. या सूचनांचे पालन करून वाहतूक कोंडी टाळण्याबाबत चालकांचे प्रबोधन करण्यात आले.

कार्तिकी वारीच्या संपूर्ण कालावधीत अशा प्रकारची विशेष तपासणी मोहीम सुरू ठेवण्यात येणार असून, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तसेच प्रवाशांकडून अवाजवी भाडे आकारणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

कार्तिकी वारीसाठी पंढरपूर येथे येणाऱ्या सर्व रिक्षाचालकांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, प्रवाशांकडून नियमानुसार भाडे आकारावे, गर्दीच्या ठिकाणी सुरक्षितपणे वाहन चालवावे, निर्धारित मार्ग व वाहतूक व्यवस्थेचे पालन करावे तसेच वारकरी व भाविकांशी सौजन्यपूर्ण व सहकार्याची भूमिका ठेवावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, विजय पाटील यांनी केले आहे.

हरवले आहे

मरीआई देऊळ ट्रस्ट रजिस्टर क्रमांक A-1335 असा आहे. या संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र व संस्थेचे इतर कागदपत्रे असलेली फाईल दिनांक 09/10/2026 रोजी लष्कर अशोक नगर ते धर्मादाय आयुक्त कार्यालय दरम्यान हरवले आहे. ते कोणालाही मिळाल्यास खालील पत्त्यावर किंवा मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

शिवाजी गोपाळ बनसोडे

रा.2552 उत्तर सदर बझार, अशोक नगर, लष्कर सोलापूर मो. 9421336633

सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३००१.
घनकचरा व्यवस्थापन विभाग
e-mail : smc.swmdepartment@gmail.com

जा.क्र/घनकचरा व्यवस्थापन विभाग/५९२ दि.१६/११ /२०२६

ई-निविदा सुचना क्र..../२०२६-२७

सोलापूर महानगरपालिकेकडील घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना अंतर्गत प्रभाग ०५ ड मध्ये प्लॉट नं. १७ व प्लॉट नं. १८ या दोन ठिकाणी सार्वजनिक शौचालय बांधणे. या कामची निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि.१६/११/२०२६ स. १०:०० पासून www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

ई-निविदा प्रक्रिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सुचनेनुसार राहील .

1) (Tender id - 2026_SMC_1354776_1)
2) (Tender id – 2026_SMC_1354787_1)

सही/-
सहा.आयुक्त
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

कार्तिकी वारीच्या पार्श्वभूमीवर पंढरपुरात सलग तीन दिवस अतिक्रमण हटाव मोहीम



पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):- कार्तिकी वारी महायात्रा २०२६ च्या पार्श्वभूमीवर पंढरपूर शहरात दाखल होणाऱ्या लाखो भाविकांची सुरक्षितता आणि गर्दीचे नियोजन लक्षात घेऊन जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार शहरात सलग तीन दिवस विशेष अतिक्रमण निर्मूलन मोहीम राबविण्यात आली. पंढरपूर नगरपरिषद, जिल्हा प्रशासन आणि पोलीस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ही धडक कारवाई करण्यात आली. असल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

रविवार, दि. १५ नोव्हेंबर ते मंगळवार, दि. १७ नोव्हेंबर या कालावधीत शहरातील प्रमुख रस्ते, मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग आणि चंद्रभागा वाळवंट परिसरातील अनधिकृत अतिक्रमणे हटविण्यात आली.

पहिल्या दिवशी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते स्टेशन रोड, चौफाळा ते महाद्वार घाट, अहिल्यादेवी चौक ते गजानन महाराज मंदिर तसेच चंद्रभागा वाळवंट परिसरातील अतिक्रमणे हटविण्यात आली. यामध्ये अनधिकृत टपऱ्या आणि उसाच्या दुकानांचाही समावेश होता. संबंधित व्यावसायिकांना सार्वजनिक जागेवर पुन्हा अतिक्रमण न करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

दुसऱ्या दिवशी स्टेशन रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते चौफाळा रोड आणि गांधी रोड ते प्रदक्षिणा मार्गावरील अतिक्रमणे हटविण्यात आली. चौफाळा ते मंदिर परिसरातील दुकानदारांना दुकाने व विक्रीचे साहित्य पांढऱ्या पट्टीच्या आत ठेवण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या.

तिसऱ्या दिवशी चौफाळा ते मंदिर परिसरातील पांढऱ्या पट्टीबाहेरील अतिक्रमणे हटविण्यात आली. तसेच प्रदक्षिणा मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते अर्बन बँक आणि गजानन महाराज मठ ते भक्ती मार्ग या परिसरातील रस्त्यांवरील अतिक्रमणे काढण्यात आली.

या संयुक्त मोहिमेसाठी तीन दिवसांत पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता. पहिल्या दिवशी २ पोलीस अधिकारी व ४ कर्मचारी, दुसऱ्या दिवशी ३ पोलीस अधिकारी, ८ कर्मचारी व ५ होमगार्ड, तर तिसऱ्या दिवशी २ पोलीस अधिकारी, ९ कर्मचारी व १० होमगार्ड यांची नियुक्ती करण्यात आली होती.

कार्तिकी वारीदरम्यान वारकऱ्यांना रुग्णवाहिका, अग्निशामक दल यांसारख्या आपत्कालीन सेवा विनाव्यत्यय उपलब्ध व्हाव्यात, तसेच गर्दीच्या ठिकाणी चेंगराचेंगरीसारखी दुर्घटना टाळता यावी, यासाठी रस्ते व सार्वजनिक जागा मोकळ्या ठेवणे आवश्यक आहे. या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत जिल्हा प्रशासनाचे अधिकारी, नगरपरिषदेचे अधिकारी व २० कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि होमगार्ड यांनी सहभाग घेतला.

शहरात यापुढे अनधिकृत अतिक्रमण केल्यास आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ मधील लागू तरतुदींनुसार कठोर कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे.

Classified - छोटी जाहीरात

बोअरवेल

सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
9420766666

(सरकार मान्य)

अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
सिक्युरिटी गार्ड
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

वर-वधू




जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
उमेश माने
मो. 9353370779
रेखा बर्वे
मो. 7218370779

वाचकांसाठी निवेदनः या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.
मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर
संपर्क - 9422602337, 8317212037

कटूसत्य शब्दकोडे



उभे शब्द : १) राष्ट्रवादीचे एक माजी मंत्री व सध्याचे खासदार २) निसर्ग (हिंदीत) ३) महिना ४) पुजाऱ्याजवळील तुतारी ५) श्रीकृष्णाची आई ६) शिवसेनेचे माजी मंत्री-**** रावते ७) सैन्यदलाचा प्रमुख, सेनापती ११) डाळीपासून बनविलेले तिखट नसलेले कालवण १२) दाक्षिणात्य चित्रपट अभिनेता-*** हसन १५) वाद्यांचा होणारा आवाज, निनाद १६) दशा, अवस्था, मागच्या वेळी १७) मजबूत, कणखर १८) ढग (हिंदीत) २०) बशीचा साथीदार २३) गाणे गाणारा, गवई २६) अमिताभचा एक चित्रपट-मि. ****** २७) लाकूड कापण्याचे साधन २८) लोकजनशक्ती पार्टीचे स्व.नेते-रामविलास **** २९) एक आणि अर्धा ३१) पाणी निघून जाण्यासाठी खोदलेला खंदक ३२) कावळा ३३) स्पर्शाने लोखंडाचे सोने करणारा कथित घटक ३४) एक हिंदी न्यूज चॅनल ३५) किलोमधील चौथा भाग ३७) सैन्याला पुरवला जाणारा दाणागोटा ४२) आंब्याचा एक प्रकार ४४) रख उलट लिहा ४५) या राज्याची राजधानी पणजी आहे ४७) पाण्याचे बाष्परूप

आडवे शब्द : १) महाराष्ट्राचे एक माजी मुख्यमंत्री, आ. प्रणिती शिंदेचे वडील ६) रात्रच्या विरूध्दार्थी शब्द ८) दहा (हिंदीत) ९) बोभाटा, बोलबाला १०) त्वरेने, पटकन १३) जरचा साथीदार १४) गर्मीमुळे होणारी उलघाल, बेचैनी १७) राजाची सभा १९) मऊ नसलेले, कडक २१) पोहणे २२) नोकरदाराला मिळणारे वेतन २४) कमळ (हिंदीत) २५) पाऊस (इंग्रजीत) २७) लाकडी फळ्या ठोकून केलेले घराचे छत ३०) सततचा मागणीचा केलेला पाठपुरावा, तगादा ३२) वस्त्र ३४) एक म्हण-भीक नको पण कुत्रा *** ३५) मनी नाही भाव अन् देवा मला ** ३६) पंढरपूरला पायी जाणारे भाविक ३८) रज उलट लिहा ३९) नवऱ्याची दुसरी बायको ४०) रक्तवाहिनी, शीर ४१) तीन दुणे ४३) मुस्लिम धर्मामध्ये पती-पत्नीचे एकमेकांपासून विभक्त होणे ४६) औषध (हिंदीत) ४८) रंग (इंग्रजीत) ४९) शासकीय कर्मचाऱ्यांचा सुट्टीचा दिवस ५०) वरून काटेरी पण आतून गोड असणारे कोकणात मिळणारे एक फळ

सुडोकु - 101

	9	3	4	2	7	5		
		7		1	5	3		
	2	4	6	8				7
3			7	6		2	1	9
6								
			1	3				
4		5	8			9	2	6
		1	2		6		7	3
	7				9	8		

सचिन कल्याणशेट्टी यांची डीसीसी बँकेत बिनविरोध एन्ट्री!

DCC बँक निवडणूक :



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत अक्कलकोट तालुक्याचे राजकीय गणित अखेर स्पष्ट झाले असून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सोसायटी मतदारसंघातून बिनविरोध संचालकपद पटकावले आहे. शेवटच्या क्षणी संजीव सिद्राम पाटील यांनी उमेदवारी मागे घेतल्याने कल्याणशेट्टी यांचा बँकेवरील प्रवेश निश्चित झाला. या निकालामुळे अक्कलकोटच्या सहकार क्षेत्रात नव्या नेतृत्वाची नोंद झाली आहे.

जिल्हा बँकेची निवडणूक यंदा केवळ संचालक निवडण्यापुरती मर्यादित राहिली नाही, तर जिल्ह्यातील राजकीय ताकद आणि सहकारावरील पकड तपासणारी ठरली. या पार्श्वभूमीवर अक्कलकोट मतदारसंघातील लढतीकडे विशेष लक्ष होते. सुरुवातीला आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यासमोर संजीव पाटील आणि विश्वेश्वर नागूर यांचे आव्हान होते. मात्र, नागूर यांनी आधीच माघार घेतली आणि अखेर संजीव पाटील यांनीही शेवटच्या टप्प्यात माघार घेतल्याने कल्याणशेट्टी यांचा बिनविरोध विजयाचा मार्ग मोकळा झाला.

विशेष म्हणजे, संजीव पाटील यांनी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील आणि माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यामुळे ही लढत रंगतदार होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र, प्रत्यक्ष निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात राजकीय समीकरणे बदलली आणि प्रतिस्पर्ध्यांनी माघार घेतल्याने कल्याणशेट्टी यांनी बाजी मारली.

जिल्हा बँक ही शेतकरी, सोसायट्या आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाची संस्था आहे. त्यामुळे संचालक म्हणून कल्याणशेट्टी यांच्यासमोर केवळ राजकीय प्रतिनिधित्व नव्हे, तर शेतकऱ्यांना कर्जपुरवठा, सोसायट्यांचे प्रश्न आणि बँकेच्या आर्थिक बळकटीसाठी काम करण्याचे आव्हान असेल. बिनविरोध निवडीने राजकीय आघाडी मिळाली असली, तरी सहकार क्षेत्रातील कामगिरीतून आपली छाप उमटवण्याची खरी कसोटी आता सुरू होणार आहे.

मोहिते-पाटलांचे आठ जणांचे पॅनल; 'शिट्टी' चिन्हाला पहिली पसंती



DCC बँक निवडणूक :

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत अर्जुनसिंह मोहिते-पाटील यांनी आठ उमेदवारांचे 'स्वाभिमानी शेतकरी सहकार पॅनल' तयार केले आहे. या पॅनलमधील सर्व आठ उमेदवारांनी एकाच निवडणूक चिन्हाची मागणी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे केली आहे. यामध्ये प्राधान्यक्रमाने शिट्टी, कपबशी आणि नारळ या चिन्हांची मागणी करण्यात आली आहे.

या पॅनलमध्ये अर्जुनसिंह मदनसिंह मोहिते-पाटील, सिंधू सुरेश पाटील, अस्मिता सुरेश गायकवाड, दत्तात्रय तात्या खडतरे, अनिकेत चंद्रकांत देशमुख, संग्रामसिंह अजितसिंह जहागीरदार, शिवाजी बलभीम पाटील आणि अमोल बाळासाहेब शिंदे यांचा समावेश आहे.

या आठही उमेदवारांनी १७ नोव्हेंबर रोजी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सामूहिक अर्ज सादर केला. पॅनलमधील सर्व उमेदवारांना एकसमान निवडणूक चिन्ह मिळावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

डीसीसी बँकेच्या निवडणुकीत मोहिते-पाटील गटाने स्वतंत्र पॅनल उभे केल्याने निवडणुकीतील राजकीय समीकरणांना नवे वळण मिळण्याची शक्यता आहे. विशेषतः अर्जुनसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखालील या पॅनलची पुढील रणनीती काय असणार, याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

अनगरचे दोन्ही बंधू डीसीसी बँकेत

बाळराजे यांच्यानंतर अजिंक्यराणा पाटीलही बिनविरोध

DCC बँक निवडणूक :



मोहोळ (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत मोहोळ तालुक्यातील पाटील कुटुंबाने पुन्हा एकदा आपले सहकार क्षेत्रातील प्रतिनिधित्व अधोरेखित केले आहे. यापूर्वीच मोहोळ तालुका सोसायटी मतदारसंघातून लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील यांची बिनविरोध निवड झाली होती. आता इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) मतदारसंघातून अजिंक्यराणा पाटील यांचीही बिनविरोध निवड झाली आहे. त्यामुळे जिल्हा बँकेत पाटील कुटुंबाचे दोन प्रतिनिधी संचालक मंडळात असणार आहेत.

संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागलेल्या जिल्हा बँकेच्या निवडणुकीत अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी अनेक महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. त्यामध्ये अजिंक्यराणा पाटील यांच्या बिनविरोध निवडीकडे मोहोळ तालुक्याच्या दृष्टीने विशेष लक्ष वेधले जात आहे.

माजी आमदार राजन पाटील यांचे पुत्र अजिंक्यराणा पाटील यांनी सुरुवातीपासूनच ओबीसी मतदारसंघातून निवडणुकीची तयारी केली होती. या मतदारसंघातून त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. अर्ज माघारीच्या दिवशी दिवसभर जिल्हा उपनिबंधक कार्यालयात थांबून त्यांनी निवडणुकीच्या घडामोडींवर लक्ष ठेवले. अखेर प्रतिस्पर्धी उमेदवारांनी माघार घेतल्याने त्यांची बिनविरोध निवड निश्चित झाली.

विशेष म्हणजे, अजिंक्यराणा पाटील यांच्यासाठी या मतदारसंघातील उमेदवारी माघारीच्या घडामोडी महत्त्वाच्या ठरल्या. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत ओबीसी प्रवगार्तून त्यांनी बाजी मारली आहे. यापूर्वी त्यांचे बंधू बाळराजे पाटील यांची मोहोळ सोसायटी मतदारसंघातून बिनविरोध निवड झाली आहे. त्यामुळे पाटील कुटुंबाचे जिल्हा बँकेतील प्रतिनिधित्व दोन वेगवेगळ्या मतदारसंघांतून निश्चित झाले आहे.

राजन पाटील यांचे मोहोळ तालुक्यातील सहकार क्षेत्रात दीर्घकाळापासून राजकीय आणि संस्थात्मक कामकाज राहिले आहे. लोकनेते शुगरच्या माध्यमातून बाळराजे पाटील सहकार क्षेत्रात सक्रिय आहेत, तर अजिंक्यराणा पाटील यांनी ओबीसी मतदारसंघातून जिल्हा बँकेत प्रवेश केला आहे. त्यामुळे तालुक्यातील सहकार क्षेत्राच्या दृष्टीने या दोन्ही निवडी महत्त्वाच्या मानल्या जात आहेत.

जिल्हा बँक ही शेतकरी, विकास सोसायट्या आणि विविध सहकारी संस्थांच्या आर्थिक व्यवहारांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे या बँकेच्या संचालक मंडळात मोहोळ तालुक्याचे प्रतिनिधित्व वाढल्याने आगामी काळात तालुक्यातील सहकारी संस्था, शेतकरी आणि आर्थिक प्रश्नांबाबत या प्रतिनिधींची भूमिका काय राहणार, याकडे लक्ष लागले आहे.

एकीकडे बाळराजे पाटील यांची यापूर्वीच बिनविरोध निवड, तर दुसरीकडे आता अजिंक्यराणा पाटील यांची ओबीसी मतदारसंघातून बिनविरोध निवड, अशा प्रकारे मोहोळच्या पाटील कुटुंबाने जिल्हा बँकेच्या निवडणुकीत दोन जागांवर आपले प्रतिनिधित्व निश्चित केले आहे.

प्रशांत परिचारक बिनविरोध

DCC बँक निवडणूक :



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत महत्त्वाची राजकीय घडामोड घडली असून, प्रशांत परिचारक यांची बिनविरोध निवड झाली आहे. जिल्हा बँकेच्या सत्तासमीकरणाच्या दृष्टीने या निवडीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत सुरुवातीपासूनच अनेक दिग्गज नेत्यांनी आपले नशीब आजमावले होते. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापासून ते छाननी आणि अपील प्रक्रियेपर्यंत निवडणूक चांगलीच चर्चेत राहिली. काही प्रमुख नेत्यांचे अर्ज बाद झाले, तर काहींनी राजकीय परिस्थितीचा विचार करून माघार घेतली. त्यामुळे निवडणुकीतील समीकरणे सातत्याने बदलत राहिली.

या पार्श्वभूमीवर प्रशांत परिचारक यांची बिनविरोध निवड महत्त्वाची मानली जात आहे. पंढरपूरच्या राजकारणात प्रभाव असलेले परिचारक यांचे सहकार क्षेत्रातील स्थानही महत्त्वाचे आहे. त्यामुळे त्यांच्या निवडीमुळे जिल्हा बँकेच्या आगामी राजकीय घडामोडींना नवे वळण मिळण्याची शक्यता आहे.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर गेल्या अनेक वर्षांपासून प्रशासकीय कारभार होता. आता निवडणुकीच्या माध्यमातून नवीन संचालक मंडळ अस्तित्वात येत आहे. त्यामुळे बँकेच्या कारभाराची दिशा, नेतृत्व आणि अध्यक्षपदाची निवड याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

प्रशांत परिचारक यांच्या बिनविरोध निवडीमुळे त्यांच्या समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील ही एक महत्त्वाची घडामोड ठरली आहे.

भूजलाचा अभ्यास न करताच बोअरवेल बंदीचा निर्णय कशासाठी ?

डॉ. पोपट माळी आक्रमक; मुख्यमंत्र्यांना कायदेशीर नोटीस

सोलापूर (कटूसत्य वृत्त): राज्यातील भीषण दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी शासनाने विंधन विहिरी (बोअरवेल) घेण्यावर घातलेली सरसकट बंदी शेतकऱ्यांच्या मुळावर उठणारी आहे. भूजलसाठ्यांचा कोणताही शास्त्रीय अभ्यास न करता घेतलेला हा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अशी आक्रमक मागणी निवृत्त भूगर्भशास्त्रज्ञ डॉ. पोपट माळी यांनी केली आहे. याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाचे वकील अशोक ताजणे यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना कायदेशीर नोटीस पाठवण्यात आली आहे.

शासनाने काही जिल्ह्यांमध्ये १५ डिसेंबर २०२६ पर्यंत बोअरवेल घेण्यास तात्पुरती सूट दिली असली, तरी हा कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही, असे नोटिसीत नमूद



करण्यात आले आहे. प्रत्येक भागातील भूजलाची उपलब्धता, भूगभार्ची रचना आणि नैसर्गिक परिस्थिती यांचा तांत्रिक अभ्यास न करता संपूर्ण भागासाठी एकच नियम लागू करणे शास्त्रीयदृष्ट्या चुकीचे असल्याचे डॉ. माळी यांनी म्हटले आहे.

भूगर्भातील जलसाठे हे विखुरलेल्या स्वरूपात असतात. त्यामुळे अवघ्या पाच ते दहा फुटांच्या अंतरावरही भूजल उपलब्धतेमध्ये फरक असू शकतो. अशा परिस्थितीत प्रत्येक ठिकाणची भौगोलिक रचना तपासल्याशिवाय सरसकट बोअरवेल बंदी लादणे योग्य नाही. डॉ. माळी यांना सोलापूर विद्यापीठ आणि वालचंद महाविद्यालयात भूशास्त्र विषयाचे अध्यापन व संशोधनाचा तब्बल ३७ वर्षांचा अनुभव आहे.

यंदा 'सुपर एल निनो'च्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता असून, त्याचा प्रभाव फेब्रुवारी २०२७ पर्यंत राहण्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केल्याचा उल्लेखही नोटिसीत करण्यात आला आहे. पावसाअभावी खरीप आणि रब्बी पिकांचे नुकसान झाले असून, आता शेतकरी स्वतःच्या खर्चाने फळबागा वाचवण्यासाठी नवीन जलस्रोतांचा शोध घेत आहेत. मात्र, बोअरवेल बंदीच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.

फळबागा पाण्याअभावी जळून गेल्यास त्या पुन्हा उभ्या करण्यासाठी सात ते आठ वर्षांचा कालावधी लागतो. त्यामुळे हाताशी आलेल्या फळबागा वाचवण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू आहे. दुसरीकडे, १५ डिसेंबरनंतर बोअरवेल बंदी लागू होणार असल्याच्या चचेर्मुळे बोअरिंगच्या दरात मोठी वाढ झाली असून, बोअरवेल खोदणाऱ्या गाड्याही सहज उपलब्ध होत नसल्याने शेतकरी आर्थिक आणि मानसिक अडचणीत सापडले आहेत.

दुष्काळात भूजल वापरायचे नाही तर कधी वापरायचे? भूजल सुरक्षिततेचा उद्देशच संकटाच्या काळात पाण्याचे योग्य व्यवस्थापन करणे हा आहे. मात्र, अशा कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांना उपलब्ध भूजल वापरण्यापासून रोखले जात असेल, तर या जलसाठ्यांचा उपयोग तरी काय, असा सवालही डॉ. माळी यांनी कायदेशीर नोटिसीद्वारे उपस्थित केला आहे.

अल्पभूधारकांसाठी सार्वजनिक बोअरवेलचा पर्याय द्या !

बोअरवेल बंदीच्या आदेशाचा पुनर्विचार करून प्रत्येक भागातील नैसर्गिक परिस्थिती आणि भूजल उपलब्धतेनुसार शेतकरी हिताचा निर्णय घ्यावा. तीव्र दुष्काळात शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सरसकट बंदी लागू करू नये. अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी शासनाने सार्वजनिक बोअरवेल किंवा वॉटर पॉईंटची व्यवस्था करून त्यावर ग्रामपंचायतीचे नियंत्रण ठेवावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

सरसकट बंदी घालून शेतकऱ्यांना उपलब्ध भूजल वापरण्यापासून रोखणे म्हणजे भारतीय संविधानाने दिलेल्या जीवन जगण्याच्या हक्काचे उल्लंघन असल्याचा दावा नोटिसीत करण्यात आला आहे. शासनाने प्रशासकीय दबाव आणण्याऐवजी शेतकऱ्यांना सहकार्य करावे; अन्यथा बळीराजा पूर्णपणे उद्ध्वस्त होईल, असा इशाराही डॉ. पोपट माळी यांनी दिला आहे.

जिल्ह्यातील 198 गावांना 229 टँकरद्वारे पाणीपुरवठा

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्ह्यात टंचाई निवारणार्थ दि. 16 नोव्हेंबर 2026 रोजी 229 गावे व 957 वाड्यांमधील 3 लाख 99 हजार 935 नागरिकांना व 1 लाख 95 हजार 297 पशुधनाला 229 टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. याशिवाय 50 विहिरी व 32 बोअर असे एकूण 82 जलस्रोत अधिग्रहित करण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता व्ही.डी. राठोड यांनी दिली.

तालुकानिहाय मंगळवेढा 45 गावे - 58 टँकर, सांगोला 39 गावे - 55 टँकर, अक्कलकोट 27 गावे - 17 टँकर, माढा 16 गावे - 22 टँकर, बार्शी 17 गावे - 7 टँकर, करमाळा 16 गावे - 15 टँकर, माळशिरस 11 गावे - 11 टँकर, उत्तर सोलापूर 9 गावे - 16 टँकर, दक्षिण सोलापूर 7 गावे - 10 टँकर, मोहोळ 10 गावे - 17 टँकर असून पंढरपूर 1 गाव व 1 टँकर.

जिल्ह्यात टंचाईग्रस्त भागात टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठा सुरू असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

राष्ट्रीय शालेय रग्बी स्पर्धेत 'मा.बबनरावजी शिंदे विद्यालयाचा डबल धमाका

टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):- त्यागराज स्टेडियम दिल्ली येथे राष्ट्रीय शालेय रग्बी स्पर्धा पार पडल्या या स्पर्धेमध्ये मा.बबनरावजी शिंदे विद्यालय अकोले खुर्द च्या रग्बी खेळाडूंनी राष्ट्रीय शालेय रग्बी स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करत क्रीडाकौशल्याचे प्रदर्शन दाखवत कौतुकास्पद यश संपादन केले आहे.

१९ वर्ष वयोगटात कु.प्राजक्ता सर्जेराव सोलंकर हिने सुवर्णपदक



मिळविले तर १४ वर्ष वयोगटात कु.ईश्वरी योगेश फरतडे हिने कांस्यपदक मिळविले.

विद्यालयातील खेळाडूंनी दाखवलेले नैपुण्य, चिकाटी आणि उत्कृष्ट संघभावन या मुळे यश संपादन केले.

यशस्वी खेळाडूंना विजयकुमार माने, बिराजदार,जोतीराम श्रीराम, ओंकार लोंढे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल, आपल्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा करमाळा तालुक्याचे मा.आमदार संजय मामा शिंदे तसेच प्रशालेचे प्राचार्य राजेंद्र ठोंबरे, स.रा.मोरे विद्यालय अकोले खुर्द च्या मुख्याध्यापिका सौ. सुरवसे मॅडम, सोलापूर जिल्हा रग्बी असोसिएशन चे सहसचिव संजय शिंदे तसेच संस्थेतील सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून सर्व विद्यार्थ्यांना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

नाती जपा, माणसे जपा; हीच जीवनाची खरी श्रीमंती! - प्रा. डॉ. गणेश शिंदे



करमाळा (कटूसत्य वृत्त):- माणसाने आयुष्यात किती संपत्ती कमावली, यापेक्षा किती माणसे जोडली आणि किती नाती जपली, हे अधिक महत्त्वाचे आहे. नाती जपा, माणसे जपा, कारण माणसाच्या पश्चात त्याची संपत्ती नव्हे, तर त्याने जोडलेली माणसे आणि केलेले कार्यच त्याची खरी ओळख ठरते. माणसाचे मोठेपण त्याच्या पदात, प्रतिष्ठित किंवा संपत्तीत नसून त्याने समाजासाठी केलेल्या कार्यात आणि माणसांच्या मनात निर्माण केलेल्या स्थानात असते, असे भावस्पर्शी प्रतिपादन प्रसिद्ध वक्ते डॉ. गणेश शिंदे यांनी केले.

शेलगाव (क.), ता. करमाळा येथे दिवंगत सामाजिक कार्यकर्ते व पोलीस पाटील स्व. महादेव भगवान पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी शेलगाव-गुळसडी रस्त्यावरील पाटील फार्म येथे स्व. महादेव पाटील यांच्या स्मृतिस्थळाचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. पुढे बोलताना डॉ. शिंदे म्हणाले की, आजच्या बदलत्या जीवनशैलीत माणसे जवळ असूनही मनाने दूर जात आहेत. एकत्र कुटुंबपद्धती, परस्परांवरील विश्वास, ज्येष्ठांचा आदर आणि लहानांवरील प्रेम ही आपली खरी सांस्कृतिक संपत्ती आहे. कुटुंबातील मतभेद विसरून एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, हीच नाती टिकवण्याची खरी गुरुकिल्ली आहे. पुढच्या पिढीला केवळ संपत्तीचा वारसा देण्यापेक्षा संस्कारांचा, एकजुटीचा आणि माणुसकीचा वारसा देणे अधिक महत्त्वाचे आहे. स्व. महादेव पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या स्मृती जपण्यासाठी आणि कुटुंबातील नात्यांचे बंध अधिक दृढ करण्यासाठी पाटील परिवाराने केलेला हा उपक्रम कौतुकास्पद आहे. स्मृतिस्थळ उभारणे म्हणजे केवळ आठवणी जपणे नव्हे, तर त्यांच्या विचारांची आणि कायार्ची प्रेरणा पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे होय, असेही त्यांनी नमूद केले. व्यासपीठावर यशवंत परिवाराचे प्रमुख विलासराव घुमरे, ग्लोबल इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष डॉ. रविकिरण पवार, मुळशी तालुक्याचे माजी सभापती अण्णा खानेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विलास घुमरे यांनी पाटील कुटुंबीयांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. कुटुंबातील नातेसंबंध आणि एकजूट जपण्याचा सुंदर संदेश या कार्यक्रमातून मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. विलास पाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे २४ भाऊ आणि २३ बहिणींचा भाऊबीज सोहळा उत्साहात पार पडला. कुटुंबातील स्नेह, जिव्हाळा आणि नात्यांमधील आपुलकीचे दर्शन या सोहळ्यातून घडले. जन्मशताब्दी सोहळ्याच्या निमित्ताने एकत्र आलेल्या कुटुंबीयांनी जुन्या आठवणींना उजाळा देत परस्परांतील प्रेम आणि बंधुभाव अधिक दृढ केला. उपस्थितांसाठी स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

माणुसकीच्या दिव्यांनी उजळली अनाथाश्रमातील दिवाळी; सिंहगडच्या विद्यार्थ्यांचा स्तुत्य उपक्रम

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- दिवाळीचा आनंद केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता समाजातील गरजू आणि अनाथ बालकांसोबत सणाचा आनंद वाटून घेण्याच्या सामाजिक बांधिलकीतून एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अनोख्या पद्धतीने दीपावली साजरी केली. सिंहगड क्लब 2K26 च्या वतीने ७ नोव्हेंबर रोजी तिरुपती नगर येथील शांती अनाथ आश्रमात 'स्नेह दिवाळी झ सेवाभावी उपक्रम' आयोजित करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत अनाथाश्रमातील लहान मुलांना दिवाळीचा फराळ आणि कपड्यांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी बालकांसोबत संवाद साधत त्यांच्याबरोबर दिवाळीचा आनंद साजरा केला. या उपक्रमामुळे बालकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला, तर विद्यार्थ्यांनाही सामाजिक बांधिलकी आणि सेवाभावाचा अनमोल अनुभव मिळाला.



या उपक्रमाच्या नियोजनापासून ते प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंतची सर्व जबाबदारी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे पार पाडली. आवश्यक साहित्याची व्यवस्था, नियोजन आणि आयोजन यामध्ये विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला. विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे केलेल्या प्रयत्नांमुळे हा सामाजिक उपक्रम यशस्वी झाला.

हा उपक्रम कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य डॉ शंकर नवले यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. उपक्रमासाठी एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. एम. टी. शिंदे, मार्गदर्शन केले. तसेच प्रा. माणिक शिंदे, प्रा. यशपाल खेडकर, शिपाई मनोज बाबर यांनी सहकार्य केले.

या उपक्रमाच्या नियोजनापासून ते प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत विद्यार्थ्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. यासाठी विद्यार्थी महेश चिटमल, राजेश चिटमल, दिनेश चिटमल, अभिषेक गाजूल, समर्थ मसूती, आकाश कांडलगावकर, ओम सपार, श्रेयस पुकाळे, साकेत कांबळे, जीवनकुमार तोषनुरे, समर्थ मोरे, ओंकार शिंदे, गणेश झिंजुरते, सिद्धार्थ फडके, आरती गायकवाड, पल्लवी मडयाळ, चैत्राली टागटोडे, ईशान्वी महेशान, भारती नंदी, सुप्रिया पिसे, वैभवी गायकवाड आणि महादेवी व्यवहारे या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

सोलापूर जिल्ह्यातील नोकरी इच्छूक उमेदवारांसाठी प्लेसमेंट ड्राईव चे आयोजन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सोलापूर आणि मॉडेल करिअर सेंटर सोलापूर यांच्या विद्यमाने जिल्हयातील नोकरी इच्छूक उमेदवारांसाठी शुक्रवार दिनांक 20 नोव्हेंबर 2026 रोजी सोलापूर जिल्ह्यातील नोकरीइच्छुक उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टिने सदर रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

या रोजगार मेळाव्यात 10 वी, 12 वी, डिप्लोमा, ग्रॅज्युएट, कोणतीही पदवी, एम.ए, बी.एड, बी.पी.एड. अशा प्रकारची एकुण 257 पेक्षा जास्त रिक्तपदे 06 उद्योजकांनी ऑनलाईन अधिसुचित केलेली आहेत.

नोकरी इच्छुक उमेदवारांनी रिज्यूमच्या तीन प्रती आणि कागदपत्रासह शुक्रवार दिनांक 20 नोव्हेंबर 2026 रोजी ठीक सकाळी 11 ते दुपारी 1 वाजे पर्यत "जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थ कोट पार्क चौक, सोलापूर" येथे मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.

याबाबत अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत 0217-2992956 या दूरध्वनीवर अथवा प्रत्यक्ष भेटीद्वारे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट, पार्क चौक, सोलापुर येथे संपर्क साधावा, असे आवाहन श्रीमती, सहायक आयुक्त, संगीता खंदारे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर यांनी केले आहे. अधिक माहितीस्तव https://rojgar.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलला भेट दयावी.